# सूरसखा

## (पं.आप्पा जळगांवकर)

संपादक

**संतोष घंटे**

**परमेश्वर कामले**

क्षितिज प्रकाशन
अनंत संभावनाओं का क्षितिज

क्षितिज प्रकाशन
अनंत संभावनाओं का क्षितिज

पुस्तक प्रातीसाठी संपर्क-
हार्मोनी म्युझिक स्कूल
इन्वेंट क्लासेस, स. नं.-७२/२, आहेरनगर,
वाल्हेकरवाडी, चिंचवड, पुणे
sanvadinikalamanch@gmail.com

**सूरसखा**

©संवादिनी कला मंच, पुणे

प्रथम संस्करण: डिसेंबर 2011
मुखपृष्ठ : सुधा भारद्वाज
प्रकाशन: क्षितिज प्रकाशन,16 कोहिनूर प्लाझा
एलफिन्स्टन रोड, खड़की, पुणे - 411 003.
अक्षर संग्रह : क्षितिज प्रकाशन, पुणे - 411 003.
मुद्रक : स्टेप-इन-सर्व्हिसेस, पुणे-2
मूल्य: रु. दीडशे फक्त

SOORSAKHA

₹ 150 /-

ऋणनिर्देश

उस्ताद उस्मान खाँ
पं. प्रमोद मराठे
अमित बाबर
नाना दामले
रोहीदास कोंडे
गोविंद बेडेकर
राकेश श्रीवास्तव
अभय पोकरणा

अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| प्रस्तावना | १ |
| अल्पपरिचय | ५ |
| मार्ग एकला | ८ |
| संगत | २७ |
| बोल | ४४ |

# प्रस्तावना

भारतीय शास्त्रीय संगीतातील गायनकलेचे अनन्य साधारण महत्त्व, गायकाच्या सर्जनशीलतेमुळे निर्माण झाले. सतत कलेची साधना करणाऱ्या कलावंताला, प्रत्यक्ष मैफतील आपले गायन कसे होईल, याची कोणतीही खात्री देता येत नाही. रियाज केल्यामुळे आपल्या गळ्यावरील प्रभुत्वाचा अंदाज कलावंताला येत असतो. कलेचे सादरीकरण होताना मनात निर्माण होणारे गाणे गळ्यातून बाहेर येण्यासाठीची ती गरजही असते. मैफलीत गाणे रंगले अथवा रंगले नाही, ही अवस्था येण्याचे नेमके कारण आजही कुणाला ठामपणे सांगता येत नाही. मात्र मैफलीत हमखास दाद मिळवण्यासाठी, गायक कलावंतांना तालवाद्य आणि स्वर वाद्याची संगत करणारे, अतिशय प्रतिभावान साथीदार हवे असतात. भारतीय संगीतात आवाजाला आणि आवाज साधनेला कमालीचे महत्त्व आहे. कोणतेही शास्त्रीय उपकरण हाती नसतानाही भारतीय उपखंडात षड्ज, रिषभ, गंधार, मध्यम, पंचम, धैवत आणि निषाद या सात स्वरांची निश्चिती झाली. हे सात स्वर आणि त्या स्वरांच्या मध्ये असणारे उपस्वर म्हणजे १० श्रृती. पदार्थ विज्ञानातील नव्या उपकारणांच्या सहाय्याने या स्वरांचे स्थान शोधणे सोपे झाले. या सात स्वरांच्या पसाऱ्यातून निर्माण होणारी कला अव्याहत पणे नव्या कल्पना व्यक्त करीत आहे. निर्मितीमध्ये खंड पडू नये, एवढी प्रतिभा माणसाने आत्मसात केली आणि संगीत हा त्याच्या अखंड आनंदाचा विषय झाला.

संगीत ही हृदयाची भाषा मानली जाते. ही एक सर्वश्रेष्ठ कला मानली जाते. प्रांत, देश, जात, धर्म, वंश, लिंगभेद या सर्व भेदांना विसरण्यास लावणारी संगीत ही प्रचंड शक्ती ईश्वराने मानवाच्या हाती दिली आहे. सर्व ललित कलांमध्ये संगीत ही स्वयंप्रेरित कला आहे.



केवळ मानवच नव्हे तर साऱ्या चराचर सृष्टीवर या कलेचे अधिराज्य आहे. तसे पाहिले तर सारी सृष्टीच संगीतमय आहे, नाही का? शांत निरागस झाडांच्या पानांचा सळसळ असा आवाज असो किंवा पक्षांचा चिवचिवाट असो, कोकिळेची कुहूकुहू असो, नाहीतर नदीच्या पात्रातून दगडावरून खळखळणारा पाण्याचा आवाज असो, अगदी कानाला हवंहवसं वाटणारं संगीत. निसर्गाचे आणि संगीताचे अतुट नाते आहे.

संगीताच्या सानिध्यात असताना, मन सुख दु:खापलिकडे जाऊन स्वरविश्वाशी एकरूप होते. *ज्या भक्ता घरी गायन, वादन । त्या ठायी माझे अधिष्ठान ।।* ही तर त्रिमूर्ती दत्तात्रयांची संदेश वाणी आहे.

संगीत कला ही सर्व संगी कलांची सम्राज्ञी आहे. प्रत्यक्ष या कलेची साधना करणारे संगीत योगी तर जीवनाला क्षण अन् क्षण या सुरांच्या विश्वात एकरूप झालेले दिसतात.

भारताच्या सांस्कृतीक इतिहासात, संगीत कलेला खूप महत्त्व दिले गेले आहे. संगीतात शास्त्रीय पध्दतीने, सखोल अभ्यास करून अनेक वाद्य वाजवली जातात. आपलं संपूर्ण जीवन एखाद्या वाद्यासाठी समर्पित करून, त्या वाद्याला समाजात एक सन्मानाचे स्थान मिळवून देणे, हे कष्टाचे, साधनेचे कार्य, प्रत्येक वाद्यासाठी कोणत्या न कोणत्या वादकाने केले आहे.

शहनाई हे वाद्य पूर्वी लग्नासमारंभात वाजले जायचे, लग्नसमारंभ ते मंचावर सन्मानपूर्वक येण्याचा शहनाई या वाद्याचा प्रवास उस्ताद बिस्मील्ला खाँ साहेब यांच्या साधनेमुळे सुलभ झाला. बिस्मील्ला खाँ साहेब हे सुद्धा लग्नासमारंभात वाजवायचे, पण शहनाई या वाद्याने त्यांना भारतातील सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' प्राप्त करून दिला.

वादक आणि वाद्य यांच्यात एक अतूट नातं जुळलेलं असतं. त्या कलेपोटी आपलं प्रेम, साधना, निष्ठेमुळेच कलाकार घडतो आणि वादक-

वाद्य हे एकमेकांसाठी जगतात.

वाद्य आणि वादक यांच्या मधला एक सुंदर मिलाप, हार्मोनियम या वाद्यासोबत पण निगडीत आहे.

एखाद्या साधका प्रती अतीव आदर हा माझा जणू स्थायी भावच. साधारणपणे दहा-बारा वर्षापूर्वी युवा हार्मोनियमवादक संतोष घंटे यांचे गुरू आणि महान साधक पं. आप्पासाहेब जळगांवकर यांना भेटण्याचा योग संतोषमुळेच आला. आजच्या अपाँईटमेंट च्या जगात अचानक भेटावयास येणाऱ्या माणसांना सुद्धा प्रेमाने, आपुलकीने चौकशी करणारे आप्पाजी एक थोर, परीपक्व विचारांचे साधक वाटले. यामधे झालेल्या अनेक भेटी-नंतर, आप्पाजींच्या स्वभावाचे अनेक पैलु अनुभवास मिळाले. उ. बडे गुलामअली खाँ साहेबा पासुन उ. झाकीर हुसैन पर्यंत सर्व लहान-थोर कलाकारांना, संवादिनी साथ करणारे आप्पाजी प्रसिद्धी पासुन सदैव दुर राहिले. कलाकार म्हणुन खुप मोठी उंची लाभलेल्या आप्पाजींची नाळ, मात्र मातीशी जुळलेली होती.

तब्बल साठ हुन अधिक वर्षांच्या तपश्चर्येतून संवादिनीला प्रतिष्ठा मिळवून देणारे आणि अनेक दिग्गज गायक वादकांना आपल्या अलौकिक प्रतिभेने मोहिनी घालणारे आप्पाजी अद्वितीयच होते. श्रुतिप्रधान भारतीय संगीतात मिंडयुक्त स्वर आणि श्रुती केवळ सारंगी सारख्या तंतुवाद्यातुनच मिळू शकतात. या कल्पनेने संवादिनीला दुय्यम वागणुक देत असताना, संवादिनी मधुन स्वरविकास करून या वाद्याला प्रतिष्ठा मिळून देण्याचे मोलाचे काम आप्पांनी केले. आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत पाच पिढ्यांच्या कलाकारांशी त्यांचे ऋणानुबंध जुळले होते. जेव्हा आप्पांनी पहिल्यांदा हार्मोनियमला स्पर्श केला त्यानंतर दोघे एकमेकांत कधी मिसळुन गेले ते कळलेच नाही. आसयुक्त वादन हे त्यांच्या वादनाच वैशिष्ठ्यच होते.

अशा या थोर साधकाशी माझी भेट म्हणजे माझ्या सत्कर्माचे फलीत आहे, असे मी मानतो. त्यांच्याशी झालेल्या वार्तालापाअंती हे जीवन शब्दबद्ध झाले पाहिजे, असे मला मनोमनं वाटू लागले. आप्पांच्या पाच वर्ष चाललेल्या गाठीभेटीं नंतर मी आप्पांशी याविषयावर बोलण्याचे धाडस केले. तेव्हा आप्पा म्हणाले, माझ्या कारकिर्दीवर यापूर्वी लिखाण झालेले आहे. पण ते संकलीत केले नसल्याने प्रासंगीक मैफीली, घटना, प्रसंगांची माहिती मिळणे कठीण आहे. तरीही तुम्ही जर हे काम करत असाल तर त्याला न्याय देण्याचा परीपूर्ण प्रयत्न तुम्ही केला पाहिजे. असे म्हणून त्यांनी संतोषला सांगून, कपाटातील जुन्या वृत्तपत्रांचे चार अंक आणि काही जुनी छायाचित्रे मला सुपूर्द केली. त्यापैकी लोकसत्ता, सकाळ, तरूण भारत या वृत्तपत्रांची अंके होती. त्यात रामभाऊ जोशी, अशोक रानडे, संजय संगवई यांचे लेख होते. भारत गजेंद्रगडकर यांच्या ‘सुर गवसलेली साथ’ हे पुस्तक सुद्धा संतोष घंटे मुळे मला प्राप्त झाले.

उपलब्ध साधनाच्या आधारावर पुस्तक पूर्ण करणे शक्य नव्हते. म्हणुन आम्ही आप्पांशी जवळीकता लाभलेला कलाकारांच्या मुलाखती घेण्यास सुरूवात केली. पद्मविभुषण पं. बिरजु महाराज, किशोरी अमोणकर पासून प्रमोद मराठे, अजय पोहनकर, पं. केशव गिंडे, उ.उस्मान खाँ पर्यंत अनेक कलाकार मंडळींच्या मुलाखती घेतल्या, काही कलाकार मंडीळींच्या व्यस्ततेमुळे, त्यांच्या मुलाखती मिळु शकल्या नाहीत. तरी सर्व मंडळींचे आप्पांविषयीचे प्रेम, आपुलकी पाहुन आम्ही भारावून गेलो. पुस्तकाला पूर्णत्व प्राप्त करून देण्यासाठी क्षितिज प्रकाशनचे संजयजी भारद्वाज आणि मुद्रण संशोधनासाठी कु.मोहिनी काळे, सौ.वत्सला घंटे व सौ. अपर्णा क्षिरसागर यांची मोलाची साथ मिळाली.

या सर्वांचे प्रेमच या पुस्तक रूपाने आपणा सर्वांना देत आहोत.

परमेश्वर कामले

# पं. आप्पा जळगांवकर : अल्पपरिचय

पूर्ण नांव: सखाराम प्रभाकर जळगांवकर

जन्म : ४ एप्रिल १९२६
सोमनाथ जळगाव, जि. जालना

गुरू : ह.भ.प. बाळकृष्णबुवा चिखलीकर
उ. शब्बु खाँ

पत्नी : लिलाबाई मुधोळकर (सौ. माई जळगांवकर)

साथ संगत : माणिक वर्मा, रोशनआरा बेगम, पंडिता रोहिणी भाटे, पं. भिमसेन जोशी, उस्ताद आमीर खाँ, पं. बिरजु महाराज गंगुबाई हनगल, उस्ताद बडे गुलाम अली खाँ, किशोरी अमोणकर , पं. किशन महाराज, पं. कुमार गंधर्व, उस्ताद थिरकवाँ साहेब, पं. वसंतराव देशपांडे, उस्ताद हबीबुद्दीन खाँ डॉ. प्रभा अत्रे, उस्ताद निजामुद्दीन खाँ , पंडित जसराज, उस्ताद अल्लारखाँ , हिराबाई बडोदेकर, पं. सामता प्रसाद, परवीन सुलताना, उस्ताद झाकीर हुसैन.

मान सन्मान :

१९९३-स्वरताल रत्न -गानवर्धन संस्था, पुणे

१९९५-स्व. पन्नालाल घोष स्मृती पुरस्कार-स्व. पन्नालाल घोष जयंती समारोह समिति, पुणे



१९९६-स्वरभूषण -रसमंच,कोल्हापूर

१९९७-संगतकार -गांधर्व महाविद्यालय, पुणे

१९९९-ITC SRA AWARD - संगीत रिसर्च ॲकॅडमी, कोलकाता

२०००-गौरव- संगीत नाटक अकादमी, दिल्ली

२०००-सन्मानपत्र-नटराज फाऊंडेशन, पुणे

२०००-सन्मानपत्र-गुरुवर्य कै. मधुकर गोडसे स्मृती पुरस्कार समिती, पुणे

२००१-महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कार, महाराष्ट्र शासन मुंबई

२००१-कै. अनंत भालेराव स्मृती पुरस्कार-कै. अनंत भालेराव प्रतिष्ठान, औरंगाबाद

२००२-मानपत्र-नगरपरिषद, अहमदनगर

२००३-संवादिनी साधक पुरस्कार- सुरेल संवादिनी संवर्धन संस्था, बेळगाव

२००८-जिवनगौरव पुरस्कार-८२व्या वाढदिवसा निमित्त- अष्टविनायक मित्रमंडळ, चिंचवड

स्वर्गवास : १६ सप्टेंबर २००९

शिष्य वर्ग :

सुरेश फडतरे
हनुमंत फडतरे
आबा परकाळे
श्रीराम साठे
माधव मारणे

मुकूंद पेटकर
संतोष अत्रे
उपेंद्र सहस्त्रबुद्धे
सुरेश जाधव
मानसी जोशी
राहुल देशपांडे
संतोष घंटे
कौमुदी रास्ते
मिनल घाटे
कुमार करंदीकर

(संशोधनाअंती अनावधानाने राहिलेल्या नावांसाठी क्षमस्व)



# मार्ग एकला

## संवादिनीचा निर्मिती

हार्मोनियम हे वाद्य १८१६ साली जर्मनी मध्ये निर्माण झाले. त्यानंतर या वाद्यात काही सुधारणा करून व्हिएन्ना मध्ये हेंकेल ने फिज हार्मोनिका बनवली. जॉन ग्रीन या इंग्लंड मधल्या वाद्यकाराने सेरोफिन नामक हार्मोनियमची निर्मिती केली. या सर्व प्रयोगानंतर अलेक्झांडर दबे या फ्रान्स मधल्या वाद्यकाराने इ.स. १८४० साली पॅरीस मधून पेटंट घेतले.

हार्मोनी या शब्दाचा अर्थ संवाद असा आहे. या वाद्याने वादक आणि श्रोता यांच्यामध्ये संगीताच्या माध्यमातून भावनिक संभाषण साधता येते. म्हणूनच या वाद्याला हार्मोनियम असे संबोधले जाते. आपल्या देशात हार्मोनियम हे वाद्य संवादिनी या नावाने ओळखले जाते.

## भारतात संवादिनीचा प्रवास

भारतात १८ नोव्हेंबर १८८२ मध्ये अण्णासाहेब किर्लोस्कर यांनी 'शाकुंतल' या त्यांच्या नाटकासाठी दादा मोडक यांच्या माध्यमातून हार्मोनियम वापराचा प्रयोग केला. हार्मोनियम सोबत जवळचे नाते निर्माण करण्याची साधना पं. गोविंदराव टेंबे यांनी केली. त्यांनी संवादिनीच्या स्वरांशी जवळीकता निर्माण केली. हार्मोनियमची साधना, त्याचा लगाव निर्माण करण्याऱ्यांमध्ये अनेक महान कलाकारांचा समावेश होतो. या संवादिनी स्वरगंगेच्या प्रवाहामध्ये अनेक महान कलाकारांनी विहार केला.

आपलं अखंड जीवन हार्मोनियमसाठी समर्पित करणारा एक कलाकार जन्माला आला. त्यांचे नाव पं. आप्पासाहेब जळगांवकर. सध्याच्या जगात, कलेकडे, साईड बिझनेस किंवा छंद म्हणून बघितले जाते. असं म्हणलं जातं की कलेची साधना एक अमीर किंवा फकीरच करू शकतो.

संगीताला अंत नाही. याच संगीत महासागरामध्ये संगीतकार तथा ज्येष्ठ हार्मोनियम वादक पं. आप्पासाहेब जळगांवकर यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या जीवनाचा संघर्ष, त्यांच्या आठवणी एकत्रित करून लोकांसमोर मांडण्याचा हा अल्पसा प्रयत्न.

मैत्री संवादिनीशी

पं. आप्पासाहेब जळगांवकर यांचा जन्म ४ एप्रिल १९२६ रोजी, जालना जिल्ह्यातील सोमनाथ या लहानशा गावी झाला. आप्पांचे पूर्ण नाव सखाराम प्रभाकर जळगांवकर. सखाच्या लहानपणीच वडिलांचे छत्र हरपले. वडिलांच्या निधनामुळे, आई आपल्या मुलाचे पालन-पोषण करू शकत नव्हती. अशा परिस्थितीमुळे आईने, पूर्णपणे विचार करून, गावातल्या आश्रमात राहणाऱ्या प्रभाकर बुवा यांच्याकडे सखाला दत्तक दिले. सखाचे पुढील पालनपोषण गावातील आश्रमातच झाले. प्रभाकर हे नाव त्यांच्या पालनकर्त्याचे आहे. सखा ने गायकी शिकावी अशी त्यांची इच्छा होती. यासाठी त्यांनी सखाला घरी हार्मोनियम आणून दिली.

आश्रमाचे वातावरण धार्मिक असल्या कारणाने, तिथे नियमितपणे भजन व्हायचे. लहानपणीच भजन-किर्तन, अशा वातावरणात असल्यामुळे आप्पांचा गायकी प्रति लगाव वाढतच गेला.त्या आश्रमात वेगवेगळ्या ठिकाणांहून किर्तनकार व भजन मंडळी येत असत. लहानपणा पासूनच सखा त्यांच्या सहवासात वाढले. कधी त्यांच्यासोबत गायला लागले तर कधी संवादिनीवर साथ करू लागले. आप्पा पाच-सहा वर्षाचे असल्यापासून भजनांना संवादिनी साथ करू लागले. कधी ती भजने गाऊ लागले. आप्पा जेव्हा कुमारवयीन होते, तेव्हा त्यांचा आवाज फुटला, त्यामुळे त्यांनी आपले संपूर्ण लक्ष संवादिनीवर केंद्रीत केले .



परिस्थितीचा शिष्य

आप्पा गावातील आश्रमात राहायचे. तिथे अनेक किर्तनकार येत असत. त्या किर्तनकारांपैकी एक होते, ह.भ.प. बालकृष्ण बुवा चिखलीकर. बुवा जालन्याचे होते. ते गावा-गावात जाऊन आपल्या किर्तनाचे कार्यक्रम करत असत. आप्पांचा आवाज फुटला होता तेव्हापासून त्यांनी संपूर्ण लक्ष हार्मोनियमवर केंद्रीत केले. याच कारणामुळे आप्पांच्या वडिलांचे स्वप्न अर्धवट राहिले. बालकृष्ण बुवांचे एक वैशिष्ट्य होते, ते आपल्यासोबत तानपुरा साथीला न घेता हार्मोनियम साथीला घेत असत. या कारणामुळे आप्पांची व बालकृष्णबुवांची ओळख झाली.

बालकृष्णबुवांसोबत झालेली भेट आप्पांसाठी खूप महत्त्वाची होती. कारण याच भेटीमुळे आप्पांचा खरा संवादिनी प्रवास सुरू झाला. आप्पांना बुवांकडून राग यमन, राग भूप, राग भिमपलास यामध्ये धृपद गायकी शिकण्यास मिळाली. त्यांच्याकडूनच आप्पांनी दृत बंदिशींचे अध्ययन केले. म्हणुन असे म्हणता येईल की ह.भ.प. बालकृष्णबुवा चिखलीकर हे आप्पांचे पहिले गुरू होते.

खरंतर, आप्पा लहानपणी निर्माण झालेल्या परिस्थितीलाच पहिला गुरू मानतात. कारण, परिस्थितीमुळेच आई वडिलांपासून आप्पा वेगळे झाले. धार्मिक वातावरणात त्यांचे पालनपोषण झाले. बालकृष्णबुवांची भेट सुद्धा ओढवलेल्या परिस्थितीमुळेच झाली. व्यक्तिगत रूपात बालकृष्णबुवा हे आप्पांचे पहिले गुरू. आप्पा सांगत की, बुवा त्यांना टाळी वाजवून शिकवत.

याच काळात आप्पांनी, आपला चरितार्थ चालवण्यासाठी सायकल दुरूस्तीचे दुकान टाकले. दुरूस्ती सोबत, ते सायकल भाड्याने देत असत. त्यातून मिळणाऱ्या कमाईतून आप्पांचा चरितार्थ चालत असे.

दिवस रात्र हार्मोनियमची साधना केल्यामुळे हार्मोनियम वादनात

आप्पांनी हृदयस्पर्शी जागा व वादनाची वेगळी शैली निर्माण केली. त्यांच्या बोटांतून सहज सुंदर नादमाधुर्य निर्माण होत असे.

आश्रमात दुसरे एक किर्तनकार यायचे. पण त्यांचे नाव आप्पांना काही व्यवस्थित आठवत नाही. ते पैठणचे होते. त्यामुळे त्यांना पैठणकर म्हणून ओळखले जायचे. पैठणकरांकडून सुद्धा आप्पांना मार्गदर्शन मिळाले. त्यांच्याकडून आप्पांनी स्वरलिपी (नोटेशन) चा अभ्यास कसा करावा याचे ज्ञान प्राप्त केले.

बालकृष्णबुवा चिखलीकर व पैठणकर या दोन्ही किर्तनकारांकडे भजन गायकीसाठी लागणारे ज्ञान होते. आप्पांनी त्यांच्याकडून प्रारंभिक ज्ञान प्राप्त केले. पण शास्त्रीय संगीताचा सखोल अभ्यास करणे आवश्यक होते.

तो काळ स्वातंत्र्यापूर्वीचा होता. तेव्हा दुरदर्शनची सोय नव्हती. रेडीओ आणि ग्रामोफोन सुद्धा भारतात नवीन होते. त्यांचे अस्तित्व एखाद्या श्रीमंताच्या घरात दिसायचे. एखादं गाणं ऐकणे सुद्धा आप्पांसाठी खूप अवघड काम असायचे. तरीही आप्पा ती इच्छा पूर्ण करण्यासाठी प्रयत्नशील असायचे.

एखाद्या हॉटेलमध्ये जर ग्रामोफोन ऐकू आला तर आप्पा तिथे जात व गाणं ऐकत बसत. हॉटेल मालिक बसून देत नसेल तर चहा मागवत. आप्पा तो चहा पूर्ण गाणं संपेपर्यंत पीत बसत. अशाच प्रकारे ऐकता ऐकता, आप्पांनी कधी बंडा महाराज देगलूरकर यांना ऐकले, तर कधी पं. ज्योतीरामजीनां (पं.जसराजजींचे काका) ऐकले.

आप्पा जे ऐकत, तशी हुबेहुबपणे हार्मोनियम वाजवत. गाणं ऐकून शिकत असताना आप्पा आपले संपूर्ण लक्ष सुरांवर केंद्रीत करत. हार्मोनियम वरील पट्टी व त्यातून निर्माण होणाऱ्या जागा यांचा अभ्यास, आप्पा करत. नवीन नवीन जागांची निर्मिती करून, नवीन संशोधन करून, आप्पा स्वत:च्या तेजस्वी डोळ्यांनी लोकांसमोर मांडत. इथूनच आप्पांचा खरा संगीत



प्रवास सुरू झाला. आप्पांना एक स्वय:सिद्ध कलाकार म्हटले तर वावगे ठरणार नाही.

इ.स. १९४८ पूर्वी वास्तविक मराठवाडा निजामाच्या ताब्यात होता. औरंगाबाद, जालना अशा ठिकाणी कोणत्याही प्रकारचे सांगीतिक वातावरण नव्हते. परंतु त्यावेळी औरंगाबाद आकाशवाणी होती व त्यातील संगीतप्रेमी मंडळींशिवाय, संगीताचं नाव सुद्धा कोणी काढत नसे.

आप्पांनी त्यांच्या काही जवळच्या मित्रांना एकत्र करून 'गुरूवार संगीत मंडळ' सुरू केले. सर्वजण एकत्रपणे रियाज करत असत. अशी सांगीतिक वाटचाल सुरू असताना, एक खाँसाहेब जालन्याला स्थायिक झाले आहेत अशी बातमी त्यांच्या कानावर आली. उ. शब्बु खाँ उत्तम गवई आहेत. ते तानरस खाँ घराण्याचे आहेत. ते पूर्वी अमरावतीला रहात असत. तेथे ते संगीत वर्ग चालवत असत. अमरावतीत हिंदु-मुस्लीम दंगलीत खाँ साहेबांचे संगीतवर्गही बंद पडले. त्यामुळे खाँसाहेब जालन्याला स्थलांतरित झाले.

एक सुवर्णसंधी आप्पांसाठी चालून आली. आप्पा निश्चितच ही संधी सोडणार नव्हते. आयुष्यात संगीताशिवाय दुसरी वाटच दिसत नसल्याने आप्पा आपल्या संवादिनीसह जालन्याला आले. खाँसाहेब तेव्हा जालन्यात नायकिर्णींकडे साथसंगत करत. आप्पांनी खाँसाहेबांची भेट घेतली व साथ संगती विषयी विचारणा केली. होकार मिळताच साथसंगत सुरू झाली. त्यांच्यासोबत आप्पांनी दोन वर्ष साथ केली. आप्पांनी खाँसाहेबांना सांगितले होतं की, ''तुम्ही गात रहा, मी तुमच्या सोबत वाजवतो. जर राग चुकला तर तुम्ही मला जरूर सांगा. परंतु 'असं वाजव....तसं वाजव...' हे सांगू नका.''

दोघांमध्ये मित्रत्वाचे नाते निर्माण झाले होते आणि निश्चितच खाँसाहेबांमुळे अनेक राग परिचयाचे झाले. याच कालावधीत खाँसाहेबांकडे गाणं शिकण्यासाठी एक तरूणी दाखल झाली. तिचे नाव होते वत्सला

मुधोळकर. या वत्सलाताई मुधोळकर म्हणजेच भिमसेन जोशी यांच्या सौभाग्यवती वत्सलाबाई जोशी होय.

आप्पांनी खाँसाहेबांबरोबर दोन वर्ष हार्मोनियमची साथ केली. या दोन वर्षात आप्पाजींनी दर्जेदार साथ म्हणजे काय, आनंदनिर्मितीचे गमक काय, रागविस्तार कसा करतात, अचूक जागा कोणत्या व त्या कशा हेरतात, याचे ज्ञान अवगत करण्यावर विशेष भर दिला. त्यातुनच त्यांचा साथसंगती बद्दलचा आत्मविश्वास दृढ झाला. इतरही गायकांना साथ करावी असे आप्पांना मनोमन वाटू लागले. खाँसाहेबांच्या भेटीमुळे आप्पांचा आत्मविश्वास दृढ झाला.

पुण्याचा मार्ग

मधुताई फड्के, एक महिला किर्तनकार औरंगाबाद मध्ये आल्या. त्या पुण्याच्या होत्या, त्याकाळी निजामी राज्य होते, तरीही मधुताईंचे किर्तन ऐकण्यासाठी लोकांमध्ये वेगळाच उत्साह होता. मधुताई सुस्वरूप होत्या व अप्रतीम कीर्तन करीत. एक महिला किर्तनकार म्हणून लोकांमध्ये एक विशेष कुतूहल होते. त्यांना अनेक गावांतून किर्तनासाठी बोलावणी येत असत. मधुताईंना अनेक निमंत्रण येत होती पण त्यांच्यासोबत आलेल्या साथसंगत करणाऱ्या कलाकारांना परत जायचे होते.

मधुताईंना साथ संगतीची अडचण निर्माण झाली होती. औरंगाबाद मधील एक नावाजलेली व्यक्ति श्री. नवनीत पटेल यांनी मधुताईंचा हा प्रश्न सोडावला. त्यांना शहरात येणाऱ्या प्रत्येक कलाकाराची माहिती होती. त्यांच्याशी चांगली ओळख सुद्धा नवनीतजी ठेवत असत. त्यांनीच मधुताईंना आप्पांचे नाव सुचवले. आप्पा सुद्धा तयार झाले, मधुताई निश्चींत झाल्या.

मधुताई फडके या सुधाताईंच्या भगीनी. सुधाताई प्रख्यात पं. महादेवशास्त्री जोशी यांच्या पत्नी. आप्पांनी मधुताईंना साथसंगत करण्याची



सुरूवात औरंगाबाद पासून केली. त्यांच्या सोबत जालना, देऊळगाव, हिंगोली, नांदेड अशा अनेक गावात, शहरात मधुताईंना आप्पांची साथ संगतीचा कार्यक्रम चालू होता. मधुताईंनी आप्पांना बिदागी विषयी विचारताच, आप्पा म्हणाले, ‘मी तुम्हाला तुमच्या पूर्ण दौऱ्यात साथ देईन. त्या मोबदल्यात जर तुम्हाला बिदागी द्यायची असेल तर मला पुण्यात दोन महिन्यांसाठी खाण्या-पिण्याची व राहण्याची सोय करा.’ मधुताई पुण्याच्याच असल्याने त्या लगेचच तयार झाल्या.

हिंगोलीमध्ये जेव्हा कार्यक्रम सुरू होता तेव्हा मधुताईंना एक तार आली. त्यांच्या पतींची तब्बेत बिघडल्याचे कळताच त्यांना लगेचच पुण्याला जावे लागले. कार्यक्रम अर्धवट सोडूनच मधुताई पुण्याला गेल्या व आप्पा जालन्यात परतले.

माणिक दादरकर यांचे गाणे ऐकल्यापासून आप्पांनी पुणे-मुंबई प्रवास करण्याचे मनोमन ठरवलेच होते.

मधुताईंमुळे एक आशेचा किरण आप्पांना दिसला, पण मधुताई जेव्हापासून पुण्याला गेल्या तेव्हापासून त्यांचे पत्रही आले नव्हते. आप्पा निराश झाले होते. तीन महिन्यांनी आप्पांना मधुताईंचे पत्र आले त्यात आप्पांना मधुताईंनी दिलेल्या शब्दानुसार दोन-तीन महिन्यांसाठी राहण्याची व खाण्या पिण्याची सोय झाली आहे असे त्यात लिहिले होते.

आप्पांना हेच हवे होते, आपली हार्मोनियम घेऊन आप्पा पुण्याच्या दिशेने निघाले. त्यांना कोणाचीही साथ नव्हती, ना कोणाची ओळख, पण आप्पांनी संगीतातली ताकद चांगलीच ओळखली होती. म्हणूनच साथीला होती फक्त संवादिनी.

आप्पा साधारणपणे इ.स. १९४६ साली पुण्यात पोहोचले आणि कायम पुण्याचेच झाले.

तत्कालीन जालन्याला संगीतास पोषक वातावरण नव्हते. तेव्हा जालना जिल्हा अस्तित्वात नव्हता. औरंगाबाद शहर तसे पुढारलेले होते. त्या ठिकाणी संगीतासाठी धडपडणारे व त्याची आवड असणारे एक मंडळ होते. हे मंडळ औरंगाबाद आकाशवाणीशी संबंधीत होते. या लोकांचे संगीत मंडळ दर कोजागिरी पौर्णिमेला संगीत मैफिलीचे आयोजन करीत, त्यावेळेस औरंगाबाद आकाशवाणी केंद्राचे प्रमुख श्री. जयपाल राव होते. ते सुद्धा एक उत्तम हार्मोनियम वादक होते.

जयपाल राव यांच्या शिफारशी नुसार इ.स. १९४५ च्या कोजागिरी पौर्णिमेला या मंडळाने संगीत मैफिल आयोजली होती. या मैफलीत गाण्यासाठी पुण्याच्या सुप्रसिद्ध गायिका माणिक दादरकर अर्थात माणिक वर्मा यांना निमंत्रीत करण्यात आले होते.

ही बातमी जालन्याला आप्पांपर्यंत पोहचली. माणिक दादरकर यांची मैफिल ऐकायची, असे आप्पांनी मनोमन ठरवले. मैफिल ऐकण्यासाठी इतर चार मित्रांना राजी केले. जालना ते औरंगाबाद ४० मैल अंतर आहे. रेल्वेने जाण्यासाठी बारा आणे तिकीट होते. पाच जणांपैकी एकाच्याही खिश्यात बारा आणे नव्हते. कोजागिरी पौर्णिमा एकादिवसावर येऊन ठेपली.

आर्थिक अडचणीमुळे आप्पांनी सायकलीवर जाण्याचे ठरवले. मित्रासह सायकल प्रवास करून औरंगाबादला पोहोचले. अतिशय दर्जेदार गाणे, तेही एका महिलेचे हे पाहून आप्पा खूप खुष झाले. त्यांना मनोमन वाटले की अशा परिपूर्ण गायिकेला साथ करण्यास मिळाले तर खूप चांगले होईल. अशा परिपक्व गायिकेला साथ करून खूप शिकताही येऊ शकते हा मनातला विचार आप्पांनी आपल्या मित्रांना बोलून दाखवला. मित्रांनी आप्पांना सुनावले की 'कुठे माणिकताई, कुठे तू !' तेव्हा आप्पा काहीही बोलले नाहीत. सायकली परतीसाठी जालन्याला निघाल्या.



माणिक दादरकर यांच्या समवेत साथ करण्याचे विचार मनात घोळतच आप्पा जालन्याला पोहोचले. साथीचा योग यावा असे आप्पांना मनोमन वाटत होते.

माणिक दादरकर यांच्याशी झालेली पहिली भेट तितकीच रोमांचक ठरली. आप्पा जेव्हा पुण्यात आले तेव्हा त्यांची ओळख खाँसाहेब थिरकवाँ यांचे शिष्य दत्तोपंत जोशी यांच्याशी झाली. दत्तोपंत एकदिवस आप्पांना म्हणाले की आपल्याला कोणालातरी भेटायला जायचे आहे, आप्पांनी जास्त विचारपूस केली नाही. दोघेजण सायकलीवर निघाले.

शनिपार जवळ येताच, सायकली एका घरासमोर लावल्या दोघांनीही त्या घरात प्रवेश केला. घराच्या पहिल्या मजल्यावर एक हॉल होता जिथे माणिकताई रियाज करत असत. दत्तोपंतांनी आप्पांना त्या हॉलमध्ये बसवले. आपण कोणाला भेटायला आलो आहोत हे आप्पांना अजूनपर्यंत माहित नव्हते. या गोष्टीपासून ते अज्ञात होते.

दत्तोपंत आत गेले थोड्या वेळानंतर बाहेर पडताना त्यांच्या पाठोपाठ माणिकताई आल्या. आप्पांना आश्चर्याचा धक्का बसला. ते खूप खुष झाले. कारण आप्पांची काही वर्षांपूर्वीची मनोमन इच्छा पूर्ण होण्याच्या मार्गावर होती. दत्तोपंत यांनी आप्पांना हार्मोनियम दिली. स्वतः तबलासंगतीसाठी बसले व माणिकताई सुद्धा तयार होऊन आल्या. माणिकताई म्हणल्या, मी ललत राग गाते.

राग ललत विषयी आप्पांना काहीही माहित नव्हते. तरीही गाणे सुरू झाल्यावर आप्पांनी माणिकताईंचे सूर हार्मोनियमच्या स्वरात मिसळले आणि असेच सुरांची साथ धरून आप्पांनी पूर्ण राग वाजवला. हा नवीन राग वाजवताना आप्पा कुठेही चूकले नाहीत. राग गायन संपताच माणिकताई म्हणाल्या, 'आप्पा एका आठवड्यानंतर तुम्हाला माझ्यासोबत वाजवायचे आहे. सांगलीला संगीत मैफिल होणार आहे. तुम्ही तयार रहा.'

इ.स. १९४७ मध्ये सांगलीत झालेल्या संगीत मैफिलीत आप्पांनी माणिकताईंना साथ केली व ही त्यांची एखाद्या मोठ्या कलाकारासोबत साथ-संगत केलेली पहिली जाहिर मैफिल होती. आप्पांना त्यांच्या सांगतीक जीवनात एक नवीन मार्ग मिळाला. माणिकताईंना साथ करण्याची सुरूवात इथूनच झाली. यानंतर अनेक साथी रंगल्या.

### बैठकीची साथ

मधुताई फडकेंच्या शनिवार पेठेत दोन खोल्या होत्या. आप्पा जेव्हा पुण्यात पोहोचले तेव्हा ते शनिवार पेठेतल्या दक्षिणमुखी हनुमान मंदिरा जवळच्या खोलीत रहावयास लागले. मधुताईंमुळे किमान रहाण्यासाठी खोली आणि दोन वेळचे खायला मिळत होते. यावेळी ते एवढ्यावरच समाधानी होते.

पुण्यात येण्याआधी आप्पांनी उ. शब्बू खाँ साहेब यांच्यासोबत चर्चा केली होती. खाँसाहेबांनी आप्पांना त्यांच्या पुण्यात राहणाऱ्या मेव्हण्याविषयी सांगितले होते. खाँसाहेबांचे मेव्हणे उ.रमझान खाँ उत्तम सारंगीवादक होते. ते शुक्रवारपेठेत एका नायकिणीकडे सारंगीवादन करीत. आप्पा दिवसभर पुण्यात फिरत व उ. रमझान खाँ यांचा पत्ता शोधण्याचा प्रयत्न करीत.

शेवटी रमझान खाँ शुक्रवारपेठेतच भेटले. त्यांची ओळख झाली. एखादे काम मिळाले तर बरे होईल अशी आप्पांनी रमझान खाँसाहेबांकडे इच्छा व्यक्त केली.

रमझानजींनी आप्पांना दत्तोपंत जोशी यांना भेटण्यास सांगितले. दत्तोपंत जोशी खाँसाहेब थिरकवाँ यांचे शिष्य . ते तबला, हार्मोनियम आणि गायन या तिनही कलांमध्ये पारंगत होते. पंतांच्या पहिल्या भेटीतच आप्पानी हार्मोनियम वाजवून दाखविली. पंत म्हणाले, ‘ठिक आहे. पुन्हा या.’ असाच



पूर्ण आठवडा गेला. आप्पांनी जिद्द सोडली नाही. तेव्हा कुठे पंत आप्पांना शुक्रवार पेठेतील दांडेकर इमारतीमधे घेवून गेले. तिथे एक नायकिणी (बैठकीत गाणाऱ्या गायिका) होत्या, त्यांचे नाव कमल नाझरेकर. पंतांनी साथीदार म्हणून आप्पांची जोडणी करून दिली. कमलबाईनी आप्पांची पेटी ऐकली व साथीसाठी बोलावले. रात्री नऊ वाजता गाणे सुरू होई व रात्री एक पर्यंत मैफिल जमायची.

मैफिलीत दौलत जादा होत असे, हे सर्व आप्पांसाठी नवीन होते कारण आप्पांनी आत्तापर्यंत कीर्तनकार व काही गायकांसोबतच संवादिनी साथ केली होती. पहिला दिवस मौल्यवान निघाला कारण कमलबाईंना त्या रात्री गाण्यासाठी भरपूर पैसे मिळाले. पूर्ण कमाईच्या दहा टक्के रक्कम साथीदारांमध्ये दिली जाई. त्या रात्री आप्पांना पंधरा रूपये मिळाले. त्याकाळी दहा रूपयात महिनाभराच्या खाण्याची सोय होई. साथसंगत करून मिळलेली आत्तापर्यंतची पंधरा रूपये ही खूप मोठी रक्कम होती. एवढी बिदागी मिळाली म्हणून आप्पा खुष होते.

आयुष्यात पहिल्यांदा एवढी मोठी बिदागी मिळवून देणाऱ्या पुण्याला आप्पांनी सलाम ठोकला. तेव्हापासून आप्पा कायमचे पुणेकर झाले.

### सहवास साधनेशी

पं. आप्पासाहेब जळगांवकर यांच्या पत्नी आधीच्या लीला मुधोळकर या नावाने ओळखल्या जात. मुधोळकर घराणं भुसावळ, जिल्हा जळगावचे . सर्वजण त्यांना प्रेमाने माई म्हणत. माईंचे वडिल जिल्हा धुळ्याच्या मिलीटरी अकाऊँट मध्ये काम करत.

इ.स. १९५० साली माईंच्या वडिलांची बदली पुण्यात झाली. तेव्हापासून मुधोळकर कुटूंब पुण्यात स्थायिक झाले. लीलाताई चांगल्या गायिका होत्या. त्याचवर्षी पुण्यात जॉली क्लबने आयोजित केलेल्या एका

मैफिलीत लीलाताई गायल्या होत्या. या मैफिलीत हार्मोनियमवर आप्पांनी व तबल्यावर मधु कुलकर्णी यांनी साथ केली. आप्पा व लीलाताई यांची ओळख या मैफिली दरम्यान झाली. तेव्हापासून लीलाताईंनी आप्पांची हार्मोनियम खूप वेळा ऐकली. त्या कायम म्हणत की, आप्पांसारखी मधुर व सुंदर साथ असेल तर गाण्यात एक वेगळीच मजा येते. याहून जास्त आप्पा विषयी त्यांनी विचार केला नव्हता. माईंचे पहिले प्रेम संगीत होते. अगदी लहानपणा पासूनच माईंनी सुरांना जवळ केलं होतं, त्यामुळे जिथे त्यांना संगीताचे ज्ञान प्राप्त होईल तिथे त्या जात. गजाननबुवा जोशी, महंमद हुसेन, मनोहर बर्वे, प्रल्हादबुवा जोशी अशा गुरूंकडून त्यांनी संगीत ज्ञान प्राप्त केलं. माईंना संगीताची खूप ओढ होती. त्या प्रेमापोटीच माई आप्पांपर्यंत पोहोचल्या. आप्पांकडून संगीत विद्या घेत असताना त्यांना जाणवले की, हार्मोनियमला मिळणारी प्रतिष्ठा खूप कमी आहे. हार्मोनियम हे वाद्य लहान मुलांच्या खेळण्यातले वाद्य आहे अशा नजरेने लोकं त्याकडे बघत. साथीसाठी हार्मोनियम वापरली जात नसे. जे वाद्य लोकांच्या नजरेत एवढे कमी होते, त्याच वाद्यावर आप्पा दिवस रात्र मेहनत करत, हाच आप्पांचा मोठेपणा होता.

लीलाताईंना दोन मोठ्या बहिणी होत्या. दोन्ही बहिणींची लग्न झाली होती. माईंच्या दोन्ही बहिणी एकदा माहेरी आल्या. माईंच्या मोठ्या बहिणीने लग्नाचा विषय काढला व त्या म्हणाल्या, 'माई तू कधी लग्न करणार आहेस,' तेव्हा माई म्हणाल्या, 'मला लग्न करायचं नाहीये, मला संगीताची साधना करायची आहे.'

लग्नाचा विषय काढताच माई थोड्याशा नाराज झाल्या व त्याच वेळी आप्पांकडे त्या शिकायला गेल्या. माईंचा उतरलेला चेहरा पाहून आप्पा म्हणाले, 'तुझी तब्बेत ठीक नाहीये का, की कोणावर राग काढून आलीयेस', माई म्हणाल्या, 'माझ्या घरी माझ्या लग्नाविषयी चर्चा सुरू आहे, मला लग्न



करायचं नाहीये मला संगीताची साधना करायची आहे'.

तेव्हा आप्पा आपल्या शांत व मिश्किल स्वभावाने म्हणाले की, 'मग, यात काय वेगळं आहे, तू तर संगीत पण करू शकतेस आणि घर-संसार पण करू शकतेस', माई म्हणाल्या, 'ते कसं शक्य आहे', आप्पा म्हणाले,'तू तुझ्या आई-वडिलांना विचार की माझ्यासारखा जावई चालेल का?'

त्यावेळेस माईंनी स्वतः थोडासा विचार करून आई वडिलांना घडलेली गोष्ट सांगितली, आप्पा ही अशी व्यक्ति होती, की त्यांच्याविषयी कोणालाच काही विशेष माहिती नव्हती. तरीही माईंच्या घरी आप्पांविषयी चर्चा सुरू झाली, लहानपणीच आई वडिलांचा सहवास दूर झाला, बालकृष्णबुवा चिखलीकर यांच्या आश्रमात लहानाचे मोठे झाले, त्यांच्या कडूनच संगीताचे प्रारंभिक धडे घेतले, जालना येथे येऊन उ. शब्बु खाँ साहेब यांच्या सारख्या मोठ्या कलाकाराना साथ केली. त्यानंतर पुण्यात आले. या व्यतिरिक्त आप्पांविषयी कसलीच माहिती कोणालाच नव्हती. ना त्यांच्या जाती धर्माची माहिती होती, ना त्यांच्या सख्ख्या नातेवाईकांची, ना कोणती नोकरी, ना आप्पा जास्त शिकलेले होते. वाचन आप्पांना आवडत असे. फक्त आणि फक्त हार्मोनियमवर सगळा चरितार्थ कसा भागेल? असा मोठा प्रश्न माईंच्या कुटूंबासमोर पडला.

आप्पांजवळ फक्त एकच गोष्ट होती ती म्हणजे संगीत, माईंचा संगीत सहवास व संगीतावरचे प्रेम पाहून त्यांच्या वडिलांनी असा विचार केला की आपली मुलगी कोणत्याही परिस्थितीत खुष राहू शकते जर तिच्यासोबत संगीत असेल. या सगळ्या गोष्टींचा विचार करून माईंच्या वडिलांनी दोघांच्या लग्नाला अनुमति दिली. इ.स. १९५७ साली आप्पांचे लग्न माई अर्थात लीला मुधोळकर यांच्याशी झाले, लग्नानंतर माई जळगांवकर या नावाने परिचित झाल्या.

लग्नानंतर लगेचच आप्पा किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका सरस्वतीबाई राणे यांना साथ करण्यासाठी कोलकत्ता दौऱ्यावर निघून गेले. हा दौरा दोन ते तीन महिन्यांचा होता. या दौऱ्यात आप्पांनी माईंना एक चिठ्ठी लिहिली. आप्पा साथसंगत करण्यात मग्न होते. या सगळ्यामुळे माईंच्या परिवाराला माईची खूप काळजी वाटायची कारण आप्पा दौऱ्यावर गेल्यावर त्या घरी एकट्या पडायच्या. यावर असा उपाय निघाला की आप्पा जेव्हा दौऱ्यावर जात, तेव्हा माई माहेरी येणार.

आप्पांनी साधारण भारतातील सर्वच कलाकारांना साथ केली. तसंच माईंनी सुद्धा घर-संसार खूप छान सांभाळला. घरातल्या कोणत्याच गोष्टीचा त्रास आप्पांना होऊन दिला नाही. त्यांनी आप्पांना कधीच विचारले नाही, 'तुम्हाला किती पैसा मिळतो', म्हणून घरातला हिशोबसुद्धा माईंनी आप्पांना सांगितला नाही. आप्पांना माईंनी पूर्ण पाठिंबा दिला. घरातल्या छोट्या मोठ्या गोष्टी सांगून कधीच त्यांचे मन विचलीत केले नाही.

माईंना, लग्नानंतर ओखा, मीठापूर, द्वारका, जामनगर, राजकोट, मोखो, अशा अनेक ठिकाणाहून मैफिली साठी आमंत्रण येत. पण तेव्हाच आप्पा भिमसेनजींना साथ करण्यात खूप व्यस्त होते तेव्हा खरच माईंना वाईट वाटायचे की आप्पा त्यांच्या संगीत मैफिलीसाठी साथ करत नसत पण माईनां साथ करणे खरच अशक्य होते. आनंद या गोष्टीचा होता की खूप श्रेष्ठ कलाकारांसोबत आप्पा साथ संगत करत होते. लग्नानंतर आप्पा व्यस्त झाले खरं पण त्यांच्यासमोर त्यांचं एक उज्वल भविष्य त्यांना दिसत होते.

माई खरंच एक समजूतदार पत्नी होत्या. आप्पा मैफिलींमध्ये व्यस्त असत, माईंनी आपल्या स्वत:चे संगीत ज्ञान प्राप्त करण्यासाठी किराणा घराण्याच्या ज्येष्ठ गायिका हिराबाई बडोदेकर यांच्याकडे जायला लागल्या. संगीतासाठी लागणारे पैसे त्या स्वत: नोकरी करून कमवत. अशाप्रकारे माईंनी आपली संगीत साधना कधीच खंडीत केली नाही.



इ.स. १९६८ मध्ये माई सवाई गंधर्व संगीत महोत्सवात गायल्या, या कार्यक्रमासाठी माईंचे वडील देखील आले होते. माईंचा त्यांना खूप अभिमान वाटला. पण, याच वर्षी माईंच्या वडिलांचे निधन झाले.

भारतातील सर्वच श्रेष्ठ कलाकरांना भेटणे. त्यांच्याशी बोलणे, सर्वच कलाकरांचे स्वभाव, गायकी पद्धत मला फक्त आप्पांमुळे अनुभवता आली असं माई म्हणत.

पुण्यात सवाई गंधर्व संगीत महोत्सवात गायल्यानंतर डॉ. नानासाहेब देशपांडे यांनी स्वतः गंगुबाई हनगल यांच्यासोबत बोलून कुंदगोळच्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवात माईंना तीन वेळा गायनाची संधी मिळाली.

प्रत्येक यशस्वी पुरूषामागे एक यश प्राप्त करून देणारी स्त्री असते असं म्हणतात, ते या जोडप्याने खरं करून दाखवलं. माईंनी आप्पांना आयुष्यात प्रत्येक वळणावर साथ केली.

### संवादिनी-आप्पा-आकाशवाणी

गायकाच्या बरोबर साथसंगत करण्यासाठी तबला आणि सारंगी ही वाद्ये भारतीय संगीतात पहिल्यापासून होती. अभिजात संगीताच्या मैफलीत संवादिनी हे वाद्य एकोणिसाव्या शतकाच्या अखेरीस रूजू झाले. सारंगी आणि संवादिनी या दोन्ही वाद्यांच्या मूलभूत स्वभावातच फरक (एक तंतुवाद्य आणि दुसरे वायुवाद्य) असला तरीही स्वरांच्या साथीला हे वाद्य आले आणि त्याने कलावंत आणि रसिकांचीही मनःपूर्वक वाहवा मिळवली. संगीत नाटकांच्या काळात प्रारंभी संवादिनी आणि नंतर ऑर्गन हे वाद्य भारतात आले. भारतीय कलावंतांनी त्यावर असे काही प्रभुत्व मिळवले, की ते वाद्य अस्सल भारतीय वाटावे . भारतीय कलावंतानी ऑर्गन, संवादिनी आणि व्हायोलिन या तीन परदेशी वाद्यांवर जो भारतीय साज चढवला, तो त्यांच्या कलात्मक जाणिवांचा परिपाकच म्हणायला हवा. त्यातील ऑर्गन आणि

संवादिनी या वाद्यामध्ये दोन स्वर गोलाईने जोडून घेणारी मींड तंतोतंत काढणे अवघड असते. तरीही हे वाद्य आपल्या मैफलीत इतके सहज मिसळून गेले, याचे कारण त्यातील अंगभूत मर्यादांवर कलावंतानी आपल्या प्रतिभेने मात केली, हे आहे.

संवादिनी भारतीय शास्त्रीय संगीताच्या मैफलीत मिसळून गेल्यानंतरच्या काळात आप्पा जळगांवकर यांनी मैफिलीत प्रवेश केला. याच काळात हे वाद्य परदेशी असल्याने त्याला नभोवाणीवर बंदी घालण्यात आली होती. ही बंदी उठवावी, यासाठी पुण्यातील प्रख्यात डॉक्टर आणि संवादिनीवादक एन. व्ही. पाबळकर यांनी अथक परिश्रम घेतले. १९४० ते ७१ या काळात आकाशवाणीवर गायनाच्या साथीला हे वाद्य घेण्यास बंदी होती, या काळात मैफलींमधून आप्पा जळगांवकर हे नाव परिचित होऊ लागले होते. वाद्य साथीचे असले तरीही स्वतंत्रपणे संगीत सादर करण्याची क्षमता त्यामध्ये आहे. हे तोवर सिद्धही झाले होते. त्यामुळेच वाद्य साथीचे असले तरीही केवळ गायकाच्या गायनाची री ओढणे एवढेच काम आप्पा जळगांवकर यांनी कधी केले नाही. गायकाच्या गळ्याला मिळणारी विश्रांती, तेवढ्याच भरदारपणे आणि कलात्मकतेने भरून काढणारा साथीदार म्हणजे जे गायले तेच वाजवणारा कलावंत नसतो, त्याने कलावंताच्या प्रतिभेला साद घालणे आवश्यक असते. मैफलीत कलावंताच्या मनात सुरू असलेल्या आंदोलनांना ओळखून त्याला काही नवे सुचवायचे असते. आपली स्वतःची प्रतिभा त्यासाठी उपयोगात आणायची असते. कलावंताची गायनशैली त्यासाठी आत्मसात करावयाची असते. एखादा कलाकार कसा गातो, याचा अभ्यास करायचा असतो. आप्पा जळगांवकर यांनी या बाबतीत भारतीय संगीतात एक आदर्श निर्माण केला. त्यांचे मैफलीत असणे कलावंत आणि रसिक या दोघांसाठीही आश्वासक असे. कलावंताला खुलवणारा संगतकार म्हणून गायक कलावंताबरोबर त्यांनी मनापासून संगत केली. अनेक



मैफिलींमधे वादक आणि स्वरवाद्यावर संगत करणारा वादक यांच्या मनोवृत्तीतही फरक असतो. केवळ लयीत वाजवणे एवढेच तबल्यावर साथ करणाऱ्या कलावंताचे काम असते हे काम आता निर्माण झालेल्या वाद्यात सहजपणे होऊ शकते. सतत फक्त तालाच्या मात्रा वाजवत राहणे हे काम यंत्रवत असते. ते कोणताच तबलावादक करत नाही तो कलावंताला लयीशी लडिवाळपणे खेळायला उद्युक्त करतो. त्याच्या प्रतिभेने लय आणि ताल यातील नवे आकार त्याच्या गायनात किंवा वादनात सहजपणे अंतर्भूत होतील, याची दक्षता घेतो. आप्पा जळगांवकर यांनी हे काम अतिशय अप्रतिमपणे केले.

## संगीतातील ऋषी

आप्पा जळगांवकरांच्या पेटीतून जसा गंधार निघतो तसं गाणं गायकाला आलं पाहिजे असं कुमार गंधर्व म्हणायचे. आप्पांच्या निधनाने अभिजात भारतीय संगीतातील ऋषी काळाच्या पडद्याआड गेला आहे. कोणत्याही मैफलीत आप्पा असले म्हणजे चैतन्य आणि मांगल्याचा वारा वाहता राहायचा. प्रत्येक माणसाला एक आंतरिक लय असते. अनेकांची आतली लय व्यक्तही होते. व्यक्त झालेली लय आणि आतली लय यात कधीकधी अंतर पडते हे अंतर शून्यावर आणण्याची क्षमता असणारा प्रतिभाशाली कलावंत म्हणजे आप्पा जळगांवकर. ५० वर्षांहून अधिक काळ त्यांनी किमान ५ पिढ्यांच्या दिग्गजांना साथ केली. जालन्याहून आलेला एक सामान्य माणूस पुण्यात एवढा मोठा कलावंत कसा झाला हे सांगताना आप्पा म्हणायचे, 'जालन्याहून आल्यानंतर पेटी नेणाऱ्या हमालाला देण्यासाठी माझ्याकडे पैसे नसत. त्यामुळे मीच, डोक्यावरून पेटी आणत असे. पुढे अभ्यास, रियाज आणि शोध एवढा केला की डोक्यावरून पेटी आणणाऱ्या माझ्यासारख्याला पुणेकरांनी डोक्यावर घेतले.'

संगीताच्या कणाकणात काय आहे, याचे दर्शन आपण घेतल्यानंतर इतरांना ते वाटण्याची दानतही आप्पांकडे होती. त्यासाठी आप्पा प्रथम गाणे शिकले. 'मधुकर पेडणेकरांनी मला पेटी दिली आणि बाळकृष्णबुवा चिखलीकरांनी ताल धरायला शिकवलं', असे आप्पा परवापर्यंत अत्यंत कृतज्ञतेने सांगत असतं. चार लाइन्सची हार्मोनियम फक्त गोविंदराव टेंबे आणि आप्पा जळगांवकर यांच्याकडेच होती. आप्पांनी ती अखेरपर्यंत सांभाळून ठेवली. गंधार किंवा धैवत पेटीतून पूर्णपणे निघतो हे आप्पांनी अनेकदा सिद्ध केले होते. संगीताच्या साम्राज्यात अनुभव आणि प्रतिभा यांच्या आधारे आप्पांचे स्वतःचे तत्त्वज्ञान तयार झाले होते. त्यामुळेच ते म्हणायचे, केवळ शिक्षणाने गाण्यात रंग भरता येत नसतो, त्यासाठी बुद्धी लागतेच. बुद्धी विकसित करावी लागते. रोशन आरासारख्या कलावतीला आप्पांनी कशी साथ दिली यासारख्या आठवणींचा खजिना आप्पा जेव्हा उलगडत तेव्हा ऐकणाऱ्याला परिसस्पर्श होत असे. स्वरांचे मातृत्व करण्याची त्यांची अंगभूत वृत्ती होती. ज्या पातळीवर स्वर लागला तेवढाच पंचम कसा धरावा हे सांगणारे आप्पा अजरामर आहेत. नुसताच भाता याचे किस्सेही आप्पा सांगत असत. आप्पांनी कीर्तनात आणि लावणीलाही साथ दिलेली होती. 'अंगणात फुलल्या जाई, माझा पती जवळ नाही' यासारख्या लावण्यांना आपण कशी साथ दिली, याबद्दलही आप्पा मित्रांशी बोलत असत. वाद्य वाजवणाऱ्यांनीच वाद्यांची बदनामी केली, अशी परखड भूमिकाही त्यांनी अनेकदा मांडली. हार्मोनियममुळे गाणे सुधारते यावर त्यांचा ठाम विश्वास होता. बंदी आली तरी पेटी टिकली याची चिकित्सा त्यांच्याकडून ऐकणे आनंददायक असे. जिवाचा कान करून गाणे कसे ऐकावे हेही आप्पा सांगत.

घराणे एकच असले तरी गायकीची पद्धत वेगवेगळी असू शकते हे लक्षात घेऊन स्वरांचे वजन सांभाळणारा हा ऋषी मराठी संस्कृतीच्या



नभांगणातील अजरामर तारा ठरला. सुरांचा निर्मळपणा, रेखीवपणा, झोक आणि ढंग यासंबंधी साध्या बोलण्यातूनही आप्पांचा अहर्निश रियाज दिसायचा. शिकणाऱ्यापेक्षा शिकविणाऱ्या व्यक्तीच्या ज्ञानाला सतत पैलू पडतात यावर श्रद्धा असल्यामुळे आप्पांनी महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील अनेक गरीब मुलांना संगीतात आणि आयुष्यात उभे केले. कोल्हापूरला किशोरी अमोणकरांनी आप्पांना जेव्हा मानपत्र दिले तेव्हा एक प्रश्नही विचारला, 'तुम्ही पेटी वाजवता म्हणजे नेमके काय करता?' या प्रश्नावर आप्पा म्हणाले, 'आम्ही गायकाच्या वाटेने मागेमागे जातो. कधीतरी कुमार, भीमसेनजी किंवा किशोरीताई यांच्याबरोबर जाताना थोडे त्यांच्या पुढेही जातो. कारण स्वरांच्या वाटा उजळण्याची त्यांची ताकद असामान्य असते.'

# संगत

स्वरगंगेची भेट

स्वातंत्र्य चळवळीच्या काळात विमल वागळे नावाच्या विख्यात गायिका होत्या. असे म्हणतात की त्या माणिकताई सारख्या गात. विमलताईं सोबत साथसंगत करायची संधी आप्पांना मिळाली. विमलताईंसोबत आप्पा लातुरला एका संगीत मैफिलीसाठी गेले. लातुरला गेले तेव्हा तिथे एकही लॉज उपलब्ध नव्हता. पुण्याहून आलेल्या या सर्व कलाकारांची सोय शासकीय विश्रामगृहात करण्यात आली.गावात वीज सुद्धा नव्हती. पेट्रोमॅक्स बत्त्या लावून कार्यक्रम संपन्न झाला.

या कार्यक्रमात डॉ. पांडुरंग पत्की यांनी आप्पांची मुलाखत घेतली. डॉ. पत्की गुलबर्गाचे राहणारे, तेव्हा ते लातुरचे मेडिकल ऑफिसर होते आणि आश्चर्याची गोष्ट अशी की, ते स्वत: आकाशवाणीचे 'ए' दर्जाचे गायक होते. आप्पांची साथसंगत त्यांना खूप आवडायची. पत्कीजींनी आप्पांना त्याच मुलाखतीदरम्यान दुसऱ्या कार्यक्रमासाठी करारबद्ध केले. त्या मैफिलीत आप्पांना गंगुबाई हनगल यांना संवादिनी संगत करायची होती. गंगुबाई हनगल यांना साथसंगत करण्यासाठी आप्पा दुसऱ्यांदा लातुरला पोहोचले. याच मैफिलीत गंगुबाईंनी आप्पांना ७५ रूपये बिदागी दिली. ही बिदागी, आप्पांना आत्तापर्यंत मिळालेली सर्वात मोठी रक्कम होती. आप्पांचा संगीता प्रति आदर, प्रेम, निष्ठा, लगन गंगुबाई हनगल यांनी या मैफिलीदरम्यान अनुभवली. एका साथसंगत करणाऱ्या व्यक्तिचे श्रेष्ठत्व गंगुबाईंनी त्यावेळी अनुभवले. तेव्हापासून आप्पा आणि गंगुबाई यांच्यातील नाते एका जिवाळ्याच्या धाग्याने बांधले गेले.

गंगुबाई हनगल यांच्यासमवेत आप्पांनी अनेक मैफिलींसाठी साथसंगत केली. गंगुबाई हनगल आप्पांपेक्षा वयाने मोठ्या होत्या. इ.स. २००० साली आप्पांना 'संगीत नाटक अकादमी' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यावर्षी



आप्पांना सवाई गंधर्व संगीत महोत्सवामध्ये गंगुबाई हनगल यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

संगीत मार्तंडाशी सख्य

एक वेळ अशी होती जेव्हा जसराजजी गात नव्हते, ते तबला वाजवत असत. जसराजींचे वडिल पं.मोतीराम हे सुद्धा गायक होते. मोतीरामजींचे भाऊ पं. ज्योतीराम हे कलाकार होते. दोघंही भाऊ मिळून गावा गावात जाऊन कार्यक्रम करीत असत. मोतीराम-ज्योतीराम दोघं भाऊ भाऊ हैद्राबादला आले. याच हैद्राबाद संस्थानामध्ये त्यांना गायक म्हणून नोकरी मिळणार होती. पण त्याचवेळेस नेमकं पं. मोतीराम यांचे निधन झाले. तेव्हा जसराजी चौदा वर्षाचे होते. जसराज यांचे मोठे भाऊ मणीराम हे उत्तम गायक होते.

मणीराम यांच्या मैफिलीत जसराजजी तबला साथ करत. इ.स. १९५० साली जसराजजी एका कार्यक्रमासाठी लाहोरला गेले होते. लाहोरला सर्व कलाकारांना विश्रांती करण्यासाठी जागा न मिळाल्याने, सर्व कलाकार एका ठिकाणी उभे होते. तेव्हा लाहोर आकाशवाणीवर पं. कुमार गंधर्व यांच्या गाण्याची मैफिल सुरू झाली होती.

उभे असलेल्या सर्व कलाकारांमध्ये पं. कुमार गंधर्व यांच्या गाण्यावर टिपण्णी देणे सुरू होते. तिथे एक कलाकार म्हणाले की जेव्हा कुमारजी रागात नसलेला स्वर घेतात तेव्हा ते गायन अजिबात बरोबर वाटत नाही. तेव्हा जसराजजी म्हणाले, मला तसं गायन केलेलं खूप आवडतं. तेव्हा त्या कलाकाराने रागात शब्द बाहेर फेकले व म्हणाले, 'तू क्या जानता है, गाने के बारे में ? तू तो चमडी पीटनेवाला है.' तेव्हा जसराजजी खूप उदास झाले.

गायक बनण्याचे मनात निश्चित करून जसराजजी तिथून निघून गेले. गायक म्हणून जसरारजींनी श्रेष्ठत्व प्राप्त केले, हे काही वेगळे सांगायला नको !

आप्पा एका मैफिलीसाठी कोलकत्ता मध्ये होते तेव्हाच जसराजजी व आप्पांची ओळख झाली. आप्पा व जसराजजी यांच्यात एक सुंदर नातं निर्माण झालं. कोलकत्ता, लाहोर, पुणे, कोची, दिल्ली अशा अनेक ठिकाणी आप्पांनी जसराजजींना संवादिनीची साथ केली. एवढेच नव्हे तर या दोघांनी संगीतातील ताकद अमेरिका व अनेक अरब देशांमध्ये दाखवून दिली.

कोची (केरळ) इथे आप्पांचा व जसराजजींचा कार्यक्रम होता. तेव्हा भारत व पाकिस्तान यांच्यात क्रिकेट सामना रंगणार होता. सर्व खेळाडू ताजमध्ये थांबले होते. आप्पा व जसराजजी पण तिथे होते. तेव्हाचे पाकिस्तान क्रिकेट टीमचे व्यवस्थापक शहरीयार खान जसराजजींना भेटले व त्यांनी मैफिल ऐकविण्यासाठी विनंती केली. आप्पा व जसराजजी यांची मैफिल होणार म्हणून सर्वांना ताज इथे निमंत्रित करण्यात आले. मैफिलीमध्ये जसराजजींनी, खास पाकिस्तानी खेळाडू सुद्धा होते म्हणून 'अल्ला तेरी मेहरबानी' ही बंदिश सादर केली. तेव्हापासून या दोघांची मैत्री कधीही दुरावली नाही.

अगदी आपल्या आयुष्याची ऐंशी वर्ष पूर्ण होऊन सुद्धा २००२ च्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवात आप्पांनी जसराजजींना अप्रतिम साथसंगत केली. मैफिल संपताच जसराजजी म्हणाले, 'गायकों का गला सुरीला होता है, लेकिन आप्पाजीकी अंगुलियां सुरीली हैं'. तिथे उपस्थित असणाऱ्या सर्व श्रोत्यांनी, उभे राहून आप्पांचा सन्मान केला.

आप्पा व जसराजजी यांच्यामध्ये एक सुंदर नातं, हे त्यांच्या आठवणींमधून दिसून येते.

समृद्ध दोन पिढ्यांचा साथीदार

उ.झाकीर हुसेन जेव्हा दहा वर्षाचे होते तेव्हापूसन आप्पांनी त्यांना साथ केली आहे. १९६२ च्या सवाई गंधर्व संगीत महोत्सवात उ. अल्लारखाँ व



त्यांचे दहा वर्षांचे पुत्र झाकीर हुसेन यांचे तबलावादन झाले. या कार्यक्रमात या पिता-पुत्र जोडीला आप्पांनी संवादिनी साथ केली. तेव्हापासून आप्पांनी उ.अल्लारखाँ व उ.झाकीर हुसेन यांना बऱ्याच कार्यक्रमात साथसंगत केली.

अमेरिकेच्या एका दौऱ्यावर उ. झाकीर हुसेन व आप्पा एक साथ गेले होते. तिथे आप्पांचा हार्मोनियम सोलोवादनाचा कार्यक्रम होता. तेव्हा आप्पांना तबल्यावर साथ उ.झाकीर हुसेन यांनी केली होती. नागपुरला झालेल्या एका कार्यक्रमात पं. बिरजू महाराज यांचे कथ्थक नृत्य, तबल्यावर उ. अल्लारखाँ व हार्मोनियमवर पं. आप्पासाहेब जळगांवकर होते. हा कार्यक्रम तीन दिग्गज कलाकार सादर करत होते-पं. बिरजू महाराज, उ. अल्लारखाँ व पं. आप्पासाहेब जळगांवकर. तो कार्यक्रम अप्रतिम झाला, श्रोत्यांना खूप आनंद मिळाला व एका अविस्मरणीय कार्यक्रमाची नोंद झाली.

हिराबाई बडोदेकर यांच्या घरी संगीत मैफिलीचे आयोजन करण्यात आले होते. या मैफिलीत पुण्यातील संगीत क्षेत्रातील अनेक श्रेष्ठ कलाकार आले होते. योगायोगाने या मैफिलीत उ.अल्लारखाँजी आले. सर्वांची अशी इच्छा होती की उ. अल्लारखाँ यांनी आपली कला पेश करावी, पण कोणाचीच बोलण्याची हिम्मत होत नव्हती. शेवटी आप्पा समोर आले व उस्तादजींना काहीतरी पेश करण्याची विनंती केली.

'तुम्ही संवादिनी साथ द्या' असे उस्तादजी म्हणाले व आप्पांच्या विनंतीला मान देऊन तबला वादनाला बसले. अशाप्रकारे हिराबाई बडोदेकर यांच्या घरी जमलेल्या मैफिलीत आप्पा व उ.अल्लारखाँ यांनी रंगत आणली. सर्वांनी त्या मैफिलीचा आनंद लुटला. मित्रत्त्वाचे व आदराचे नाते या जोडीमध्ये दिसून येते.

भारतात आज जे लोकप्रिय कलाकार आहेत त्यातील बऱ्याच जणांना, आप्पांनी साथसंगत केली आहे. ते झाकीर हुसेन असोत किंवा आजच्या ज्येष्ठ गायिका डॉ. प्रभा अत्रे असोत, अगदी आरती अंकलीकर ते संजीव अभ्यंकर या सर्वांना आप्पांची साथ मिळाली आहे.

इचलकरंजी इथे डॉ. प्रभा अत्रे यांचे गायन होते. प्रभाजी कॉलेज मध्ये शिकत होत्या. त्यांचा इचलकरंजी इथे पहिलाच कार्यक्रम होता. प्रभाताई बऱ्याच तयारीने गात होत्या, पण त्या गाण्यात रंग चढत नव्हता. पण कारण काही कळेना. गाणं चांगलं होत असतानाही, जाणकार श्रोता वर्ग सुद्धा दाद देत नव्हता.

आप्पांच्या लक्षात येताच, साथ संगत करताना अशा प्रकारे तिहाई घेऊन समेवर आले की सर्वश्रोते वाह-वाह करत दाद द्यायला लागले. प्रभाताईंना नवीन उत्साह आला. आप्पांनी दुसऱ्या आवर्तनात अनपेक्षीत तिहाई घेऊन मैफिलीत वेगळाच आनंद निर्माण केला. सुर, ताल, लय असून सुद्धा मैफिल निरस वाटत होती पण अशा मैफिलीत आनंद निर्माण करण्याचे कार्य आप्पा करत. त्याच गावात अजून दोन ठिकाणी मैफिली झाल्या.

कलाकार हा कलाकार असतो. कलाकाराला खरंच वय नसतं. तो छोटा असो किंवा मोठा, सर्व कलाकारांना मनापासून साथसंगत करणारे आप्पा आजच्या तरूण कलाकारांचे आदर्श आहेत.

स्वरभास्करांशी मैत्री

उस्ताद अब्दुल करीम खाँ व त्यांचे शिष्य सवाई गंधर्व यांच्या आशीर्वादामुळे पुण्यात सवाई गंधर्व, र.ना. लिमये, वामनराव देशपांडे, पांडुरंगशास्त्री देशपांडे, व्ही, आर. अमोणकर, डी. एम. देशपांडे, एम. कामत, वसंतराव देशपांडे, डी.पी. अत्रे, डॉ. नानासाहेब देशपांडे, भिमसेन जोशी अशा अनेक संगीत प्रेमींनी मिळून 'आर्य संगीत प्रसारक मंडळ' सुरू केले. दर शनिवारी, हे सगळे संगीत प्रेमी मिळून संगीत मैफिलीचे आयोजन करायचे.

डॉ. नानासाहेब देशपांडे यांच्यासमवेत आप्पा एका शनिवारी त्या



मैफिलीला गेले. पोहचताच आप्पांनी पाहिले की भिमसेनजी गात होते व त्यांना हार्मोनियमवर साथ देत होते पु.ल. देशपांडे. आप्पांना बघून पु.ल. देशपांडे यांनी आप्पांना 'हार्मोनियम वर साथ कर असा' हुकूम सोडला. भिमसेनजींना साथ करण्याची ही पहिलीच वेळ.

भिमसेन जोशी यांचे गुरू सवाई गंधर्व अर्थात पं. रामचंद्र गणेश कुंदगोळकर यांचे निधन १२ सप्टेंबर १९५२ पुणे इथे झाले. तेव्हा आर्य संगीत प्रसारक मंडळाने सवाई गंधर्व यांचे पुण्यस्मरण एका महोत्सवाच्या रूपात करावे असा विचार केला. याच उपक्रमाची सुरूवात इ.स. १९५३ साली झाली.

या पुण्यस्मरण समारोहाचे रूप 'सवाई गंधर्व संगीत महोत्सव' असे झाले. हा सवाई गंधर्व संगीत महोत्सव आज आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रचलीत आहे. सर्वात पहिल्या समारोहात नानासाहेब देशपांडे, भिमसेन जोशी व गंगुबाई हनगल यांनी गायन केले. १९५३ ते २००३ ही पन्नास वर्ष आप्पांनी सवाई गंधर्व संगीत महात्सवात अनेक कलाकरांना साथ केली. एवढेच नव्हे तर आप्पांनी राग जोगकंस व राग पहाडी मध्ये धून वाजवून आपले सोलोवादन या महोत्सवात प्रस्तुत केले. सवाई गंधर्व संगीत महोत्सवात सोलोवादन करणारे आप्पा दुसरे हार्मोनियम वादक होते. त्यांच्या आधी पं. मनोहर चिमोटे यांचे सोलोवादन झाले होते. सवाई गंधर्व संगीत महोत्सवात एक हार्मोनियमवादक म्हणून आप्पांचे खूप मोठे योगदान आहे.

म्हैसुरला दसरा हा सण अत्यंत उत्साहात साजरा केला जातो. या महोत्सवात अनेक कलाकारांचे योगदान असते. हा महोत्सव नवरात्रीचे नऊ दिवस चालतो. अशाच एका वर्षी भिमसेनजी गाणार होते. त्यांना हार्मोनियमची साथ करण्यास आप्पा जेव्हा सगळी तयारी करून भिमसेनजींच्या घरी पोचले, तेव्हा घरातले वातावरण आप्पांना वेगळे वाटले. भिमसेनजी रागात दिसत होते. भिमसेनजी रागात म्हणाले की आपल्याला

कुठेही म्हैसुरला वगैरे जायचे नाहीये. हे ऐकताच तबलजी निघून गेले व आप्पा सुद्धा घरी निघून आले.

दुसऱ्या दिवशीचे काही नियोजन नसल्याने आप्पा शांत चित्ताने झोपून होते. अचानक दरवाजा वाजवल्याचा आवाज आला, आप्पांनी दरवाजा उघडताच त्यांना भिमसेनजी समोर दिसले. 'चल चल आवर लवकर, आपल्याला म्हैसुरला जायचे आहे', असे भिमसेनजी म्हणताच आप्पांना आश्चर्य वाटले. आप्पा तयार झाले व दोघेजण निघाले. पुणे ते म्हैसुर अंतर ६०० कि.मी. पार करायचे होते. गाडी चालवणे हे भिमसेनजींचे आवडते काम. कुठे ही, कोणत्याही दौऱ्यावर जाताना भिमसेनजीच गाडी चालवत. पुणे ते बंगलोर व बंगलोर ते म्हैसुर असा प्रवास करत दुसऱ्या दिवशी तीनवाजता कार्यक्रमासाठी पोचले. तिकडे जाताच थंड पाण्याने अंघोळ केली व चहापाणी झाले. बरोबर चार वाजता भिमसेनजी स्टेज वर आले. त्यांचे गायन इतके अप्रतिम झाले की सगळा श्रोता वर्ग खूप खुष होता.

गाणं होताच भिमसेनजी व आप्पा तुळजापूरला होणाऱ्या मैफिलीसाठी निघाले. भिमसेनजी दोन कामं अत्यंत समर्थपणे पार करत होते. मुख्य कलाकारांची भूमिका व ड्रायव्हरचे काम. या संपूर्ण दौऱ्यात आप्पा भिमसेनजींचे निरीक्षण करत होते. दिवसभर ड्रायव्हिंग करून दोघेजण तुळजापूरला पोहोचले. सगळा थकवा दूर व्हावा म्हणून थंड पाण्याने अंघोळ हा एकच पर्याय दोघांना दिसत होता.

तुळजाभवानी मंदिरातील हा कार्यक्रम पूर्ण होताच, पुण्यातल्या नाडहब्बा महोत्सवासाठी दोघे तयार झाले. रात्रीच्या त्या मैफिलीसाठी भिमसेनजी एकदम उत्साही वाटत होते. हा कार्यक्रम संपताच चौथ्या दिवशी मुंबईच्या कार्यक्रमासाठी निघाले. या पाच दिवसांच्या दौऱ्यात आप्पांनी भिमसेनजींना खूप जवळून ओळखले. भिमसेनजी न थकता मैफिली करत होते. त्यांची ही पद्धत आप्पांना खूप आवडली.



आप्पा आणि भिमसेनजी एकदा दिल्लीला मैफिल करून परतत होते. रात्रीची वेळ होती. रात्री दिल्लीला मुक्काम करून सकाळी पुण्याला निघुयात असे आप्पांचे म्हणणे होते. कार्यक्रम झाल्यावर लगेच पुण्याला जाऊ असं भिमसेनजी म्हणत होते. या गोष्टीवरून दोघांच्यात वाद झाला. आप्पांनी आपली बॅग आणि हार्मोनियम गाडीतून काढली व म्हणाले, 'तुम्हाला जायचे असेल तर तुम्ही जाऊ शकता', तेव्हा भिमसेनजी म्हणाले, 'अरे यार पहले हम मरेंगे, फिर आप.'

त्यांच्या विनंतीचा मान राखून आप्पांनी हार्मोनियम आणि बॅग गाडीत टाकली. दिल्लीच्या बाहेर गाडीत पेट्रोल भरण्यासाठी थांबले. तेव्हा पेट्रोल भरणारा जो माणूस होता तो म्हणाला, 'साहेब इतक्या रात्री या प्रदेशातून प्रवास करणं खूप भयानक आणि धोकादायक गोष्ट आहे कारण इथून आग्रापर्यंत इब्राहिम डाकू आहे. तेवढा प्रदेश त्यांचा मानला जातो. आत्ता जाणे सुरक्षित नाही. तुम्ही रात्रीचा प्रवास करू नका, एवढी रात्र इथे काढा'.

भिमसेनजींनी त्यांचे बोलणे टाळले व ते निघाले. सात किमी. चा रस्ता पार झाला होता. पेट्रोलपंपवाल्याने जे सांगितले अगदी तेच घडले. समोर बघितले तर डाकूंची एक टोळी उभी होती. हातात रायफल, तोंडावर काळे फडके बांधून हे डाकू समोरच उभे होते. भिमसेनजी स्टेयरिंगवर होते. तेव्हा गाडीच्या खिडकीबाहेर आलेल्या तंबोऱ्याकडे हात करत आप्पा म्हणाले, 'आम्ही तर कलाकार आहोत'. डाकू म्हणाला, 'तुम्हारा नाम क्या है?' आप्पांनी स्वतःच आणि भिमसेनजींचे नाव सांगितले व म्हणाले आम्ही दिल्लीचा कार्यक्रम करून मुंबईला चाललो आहे. तेव्हा त्या डाकूने परत विचारले,'भिमसेनजी कौन हैं?' आप्पांनी भिमसेनजींकडे बोट दाखवले, भिमसेनजी स्टेयरिंगवर फक्त बनीयन पायजामावर बसले होते. आश्चर्याची गोष्ट अशी की, तो डाकू स्वतः डाकू इब्राहीम होता, त्याने भिमसेनजींची रेकॉर्ड ऐकली होती. तो गाण्याचा खूप शौकीन होता. डाकू इब्राहीम गाडीच्या

जवळ गेला. भिमसेनजींच्या पाया पडला. त्याने भिमसेनजींना जवळून पाहिले. इब्राहिम भिमसेनजींना म्हणाला, 'इथून वीस किमी. पर्यंत कोणी तुम्हाला आडवले तर फक्त माझं नाव सांगा, कोणी तुम्हाला त्रास देणार नाही.' आप्पा आणि भिमसेनजी खूप घाबरले होते, त्याच अवस्थेत तिथून गाडी काढली व दोघेजण निघाले. थोड्यावेळाने भिमसेनजी म्हणाले, 'बघितलंस आप्पा, आपल्याला काहीही झालं नाही'.

वाई आणि अकोला इथे झालेल्या मैफिलीत आप्पांनी भिमसेनजींना साथ केली. अकोला इथे झालेल्या एका मैफिलीत भिमसेनजींची तब्बेत बिघडली होती. त्या अवस्थेत भिमसेनजी गायला बसले होते. आप्पा म्हणाले, तू आराम का करत नाहीयेस, कोणतेही काम जीवापेक्षा कुठे महत्त्वाचे आहे. आजची मैफिल उद्या करू. भिमसेनजींना आप्पांचे मत पटले. आप्पा संयोजकांसोबत बोलले व भिमसेनजींचा कार्यक्रम दुसऱ्या दिवशी ठेवण्याची विनंती केली. दुसऱ्या दिवशी भिमसेनजींचा कार्यक्रम अप्रतीम झाला. त्यांनी श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

भिमसेनजींचा राग मुलतानीवर आधारित लाईव्ह कॉन्सर्ट कॅसेट आहे. ती जालंदरच्या संगीत महोत्सवात रेकॉर्ड झाली आहे. त्यातसुद्धा आप्पांनीच भिमसेनजींना संवादिनी साथ केली आहे.अमृतसर, अहमदाबादला सुद्धा आप्पा व भिमसेनजींनी मैफिल गाजवली आहे.

अहमदाबादला झालेल्या एका मैफिलीत भिमसेनजींचा गळा थोडा खराब होता. म्हणून ते म्हणाले,'सफेद एक चा सूर दे, या स्वरात शेवट पर्यंत वाजवणे जमेल का?' आप्पा म्हणाले, 'बघू स्टेजवर काय होतं ते. तबल्यावर शंकर घोष होते. या मैफिलीत आप्पांनी पूर्ण मैफिल सफेद एक या स्वरात वाजवली. आप्पांची पूर्ण तयारी होती.

आप्पा जळगांवकर व भिमसेन जोशी यांनी अनेक मैफिली केल्या. एकमेंकांविषयी आदर, त्यांच्यातील मित्रत्वाचे नाते प्रत्येक अनुभवातून दिसून येते.





बरेचसे कलाकार पुण्याच्या बाहेरून येत असत. ज्यांचा पहिल्यांदा पुण्यात कार्यक्रम आहे अशा सर्व कलाकारांना आप्पा साथ करत. नवोदित कलाकार असोत किंवा सुविख्यात कलाकार असोत आप्पांनी कधीच कोणातच भेद भाव केला नाही. प्रत्येकाचे गाणे चांगले व्हावे याच उद्देशाने आप्पा साथ करत.

असंच एकदा किशोरी आमोणकर यांचे पहिल्यांदाच पुण्यात गायन होते. किशोरी आमोणकर या जयपुर घराण्याच्या ज्येष्ठ गायिका पंडिता मोगुबाई कुर्डीकर यांची मुलगी. किशोरीताईंचा आवाज खूप छान होता. त्यांचे गायन पुण्यात आहे असे ऐकताच पुण्यातले अनेक मोठे मोठे कलाकार त्यांचे गायन ऐकण्यासाठी गेले. पं. रातजनकर आणि हिराबाई अशा कलाकारांना साथ करणारे नारायण इंदुरकर या मैफिलीत तबल्यावर साथ करणार होते. हार्मोनियमवर आप्पासाहेब जळगांवकर साथ करणार होते. कार्यक्रम सुरू झाला पण किशारीताई जरा अस्वस्थ वाटत होत्या, प्रेक्षागृह पूर्ण भरले होते. काही लोकं उभे होते.

पहिला राग संपताच किशोरीताई आप्पांना म्हणाल्या, 'हार्मोनियम बेसूर आहे का ?' या प्रश्नाने आप्पांना खूप आश्चर्य वाटले. तरीही आप्पा काहीच बोलले नाहीत. मध्यंतर झाला. तेव्हा आप्पांनी षडज, गंधार, पंचम, मध्यम असे सगळेच स्वर वाजवून दाखवले व म्हणाले, 'हे वाजवणे तुम्हाला बेसुर वाटले?' किशोरीताईंनी नकार दर्शक मान हलवली. आप्पा म्हणाले, 'ही हार्मोनियम आहे, याचे स्वर बेसुर होत नाहीत. सारंगी असती तर त्याची तार हलते व तो बेसुर होते, असं काही हार्मोनियम मध्ये होत नाही. खरंतर हा तानपुराच सुरात नाहीये.' यावर किशोरीताईंनी स्मित हास्य केले. आप्पांनी सुद्धा स्मित केले. ही घटना आप्पांनी एका सहज प्रसंगी आम्हा शिष्यांसमोर व्यक्त केली होती.

अमृतसरला झालेल्या एका संगीत समारोहात आप्पा व भिमसेनजी गेले होते. त्या मैफिलीत भिमसेनजी गाणार होते. त्यांना तबल्यावर गुलाम रसुलखाँ व हार्मोनियम साथी साठी आप्पा होते. त्याच हॉटेलमध्ये शेजारच्या खोलीत किशोरीताई आमोणकार होत्या. गॅलरीत फिरत असताना ही गोष्ट आप्पांच्या लक्षात आली. त्यांनी भिमसेनजींना ही गोष्ट सांगितली. भिमसेनजी व किशोरीताई एकमेकांना चांगले ओळखत होते. भिमसेन किशोनीताईंना भेटायला गेले. दोघंजणं बोलत बसले होते. बोलता बोलता किशारीताई म्हणाल्या, 'अमृतसर मध्ये माझे दोन कार्यक्रम आहेत, तुम्ही आप्पांना सांगा की, त्यांनी मला संवादिनी साथ करू देत. माझ्यासोबत मला साथीला आप्पाच हवे आहेत.' भिमसेनजी म्हणाले, 'मी आप्पाला विचारून बघतो, पण त्याचं काही सांगता येत नाही.' भिमसेनजीना पुण्यात झालेली घटना ठाऊक होती. भिमसेनजी आपल्या खोलीत परत आले. त्यांनी आप्पांना किशोरीताईंना साथसंगत करशील का म्हणून विचारले. आप्पा साथसंगतीसाठी तयार होते. कारण आप्पा हे एक असे व्यक्तिमत्त्व होते ज्याने कधीच कोणाबद्दलच मनात राग, द्वेष ठेवलाच नाही. मनमोकळेपणाने सगळ्यांना आपलंस करत गेले.

मैफिलीत साथसंगत झाल्यानंतर किशोरीताईंना समजले की आप्पा खूप वेगळे आहेत. आप्पांना सुद्धा किशोरीताईंचे गायन खूप आवडले. किशोरीताईंमध्ये काहीतरी वेगळेपण आहे हे आप्पांनी ओळखले.

मुलगीतर चांगली गायिका होतीच पण किशोरीताईंची आई व त्याकाळची प्रसिद्ध गायिका मोगुबाई कुर्डीकर आपल्या मुलीच्या मैफिलीत कधीच आल्या नाहीत. त्यांचे म्हणणे असे होते की जयपुर घराण्याचीच गायकी जशी आहे तशीच किशोरीताईंनी गायला हवी. पण किशोरीताईंना प्रत्येक घराण्याचा अभ्यास करून स्वतःच्या गाण्यात विविधता आणणे आवडत असे.



एकदा घरी बोलत असताना किशोरीताई आपल्या आईला म्हणाल्या, 'तू एकदा आप्पांचे हार्मोनियम वादन ऐक.' आपल्या मुलीच्या विनंतीमुळे मोगुबाईजी आप्पांना ऐकण्यासाठी किशोरीताईंच्या एका मैफिलीत गेल्या. आप्पा सूर लावत होते. तेव्हा पहिल्याच रांगेत मोगुबाईजी बसल्या होत्या. आज आपलं वादन मोगुबाई कुर्डीकर ऐकणार या विचाराने आप्पा खूप खुष झाले. ती मैफिल खूप झान झाली. मोगुबाईंनी सुद्‌धा कौतुक केले. मोगुबाई या जुन्या काळातल्या गायिका होत्या. आप्पांच्या आधी त्यांनी कधीच हार्मोनियमची साथ घेतली नव्हती. त्या सारंगीची साथ घेत. सारंगीवादक दत्तामामा पर्वतीकर त्यांना साथ करत.

सारंगीवादक दत्ताराम पर्वतीकर व मोगुबाई कुर्डीकर दोघेही गोव्याचे होते. जेव्हा मोगुबाईजी आप्पांना भेटल्या तेव्हा म्हणाल्या, 'माझी यापुढे कुठे मैफिल असेल तर नक्की तुम्हाला साथीसाठी घेईन.' आप्पांनी जो विचार केला होता, तेच त्यांना मिळाले, मोगुबाई कुर्डीकर यांना पुण्यात एका मैफिलीसाठी आमंत्रण आले होते. तेव्हा साथीला आप्पा होते व तानपुऱ्यासाठी मागे किशोरीताई होत्या. एकूण पाच मैफिली आप्पांनी मोगुबाईंना साथ केली. त्यानंतर मोगुबाई कुर्डीकर यांचे निधन झाले.

किशोरीताईंसोबत आप्पांनी पुण्यात, अमृतसर, कारवार अशा अनेक ठिकाणी साथसंगत केली आहे.

रोशनी रोशन की

इ.स. १९४० च्या जमान्यात अशी एकही गायिका नव्हती ज्यांना गाण्यासोबत दोन तबलजी लागत, गाण्याच्या दुसऱ्या भागापासून दूसऱ्या तबलजीची गरज पडत असे, कारण रोशनआराजी एवढ्या जलद गतीने गात की कायम तीच जलदलय ठेवणे तबलजींना कठीण जात. म्हणूनच सुरवातीच्या भागात एक तबलजी व दूसऱ्या भागात नवीन तबलजी,

रोशनआराजींना साथीला लागत.

लोकं आप्पांना विचारत, तुम्ही कधी रोशनआरा बेगम यांचे गायन ऐकले आहे का? भारत पाकिस्तान जेव्हा वेगळे झाले तेव्हा बेगम पाकिस्तानला निघून गेल्या. म्हणूनच आप्पांना त्यांचे गायन ऐकणे अशक्य होते. आप्पा सुद्धा याच विचारात होते की ते आता बेगमजींचे गायन ऐकणे त्यांच्या नशिबात नव्हते.

देश स्वंतत्र झाल्यानंतरची घटना आहे. जालंदरच्या संगीत महोत्सवात भिमसेनजी आणि आप्पा दोघेजण मैफिलीसाठी गेले होते.हा महोत्सव डिसेंबरमध्ये असतो. जालंदरला बऱ्याच प्रमाणात थंडी होती. गर्दी खूप असल्याने हा संगीत समारोह खुल्या सभागृहात केला जायचा. थंडीमुळे सगळेच जण गार पडले होते.

आप्पा आणि भिमसेनजी यांची मैफिल संपताच आप्पा मंचाच्या मागे पेटवलेल्या शेकोटीवर हात शेकत खूर्चीवर बसले होते. भिमसेनजी नंतर रोशनआरा बेगम गाणार होत्या. हे आप्पांना माहित नव्हते, अगदी त्याच वेळेस कोणीतरी आप्पांच्या पाठीवर हात ठेवला. आप्पांनी फिरून बघताच समोर रोशनआरा बेगमजी होत्या. त्या म्हणाल्या, ‘जरा जादा हाथ सेक लीजिए, क्योंकि आपको मेरे साथ बजाना है.’ आत्तापर्यंत आप्पा फक्त बेगमजींविषयी ऐकून होते, आज पर्यंत आप्पांनी फक्त त्यांचे कौतुक ऐकले होते मात्र आज आप्पा बेगमजींना साथ करणार होते. याहून मोठी संधी कोणती होती !

रोशनआरा बेगम यांची मैफिल अशी रंगली की एवढी थंडी असूनही सर्व श्रोते खुश झाले. टाळ्यांनी सर्व सभागृह भरून गेला. या महोत्सवानंतर आप्पांनी अमृतसर, अंबाला अशा अनेक ठिकाणी बेगमजीं सोबत साथीदाराची भूमिका पार पाडली. रोशनआरा बेगम यांना माहित होते की आप्पा हिराबाई बडोदेकर यांना सुद्धा साथ करत. हिराबाईंच्या तब्बेतविषयी



आप्पांकडे त्यांनी चौकशी केली. आप्पा जेव्हा भारत पाक बॉर्डर (वाघा बार्डर) ला रोशनजींना सोडायला गेले, तेव्हा त्या म्हणाल्या, ‘बंटवारे के कारण खुलेआम भारत में आ भी नहीं सकते. न जाने इन दो देशों के लोगों ने बेमतलब की दुश्मनी क्यों कर रखी है ?’

रोशनआरा बेगम यांना साथ करण्याचे आप्पांचे स्वप्न या निमित्ताने पूर्ण झाले.

नृत्यसंग

पुण्यात त्या काळी केशवराव भोळे प्रसिद्ध संगीतकार होते. त्यांनी माणिक वर्मांना फोन केला आणि म्हणाले, ‘पं. मल्लिकार्जुन मन्सुर आले आहेत, त्यांना तुमचे गायन ऐकायचे आहे, काय करणार आहेस ?’ माणिकजी म्हणाल्या, ‘एक तासात तुम्ही दोघं माझ्या घरी या.’ आप्पांनी माणिकताईंना संवादिनी साथ करायचे ठरले. दोन श्रोते समोर असताना माणिकताईंनी आपले गायन अत्यंत बहारदारपणे केले. केशवराव भोळे यांनी आप्पांचे खूप कौतुक केले, तेव्हा त्यांनी आप्पांना, नृत्याला साथ संगत करण्याचे आव्हान केले.

आप्पांना ही गोष्ट तेव्हा नवी होती, म्हणूनच आप्पा काहीच उत्तरले नाहीत. केशवरावजींनी त्यांना प्रयत्न करायला सांगितला व पं. रोहिणी भाटे यांची भेट घालून दिली. रोहिणीजी तेव्हा लकडीपूल जवळ नृत्याचे वर्ग घेत.

नृत्यावर आधारित एक कार्यक्रम होता त्यात संगीत संयोजन केशवराव भोळे यांनी केले होते. त्यांनी आप्पांना नोटेशन दिले. हा कार्यक्रम खूपच लोकप्रिय झाला. तेव्हापासून आप्पांचे नाव एक श्रेष्ठ हार्मोनियम वादक म्हणून घेतले जाऊ लागले. सर्व श्रोत्यांच्या मनात आप्पांनी वेगळी जागा निर्माण केली.

प्रख्यात भावगीत गायक गजाननराव वाटवे यांनी स्वारगेट इथे बंगला बांधला होता. या निमित्ताने सगळा मित्रपरिवार मिळून त्या बंगल्यामध्ये एक कार्यक्रम करायचे ठरले. एक भावगीत गायक फक्त आपल्या गायनाच्या जोरावर बंगला बांधून घेतो, त्याच दरम्यान गजाननराव वाटवे यांनी सेकंडहँड कार खरेदी केली होती, त्यामुळे त्यांचा मित्रपरिवार खूप खुष होता. पुण्यातील बरेचसे कलाकार या कार्यक्रमासाठी आले होते. गायन, वादन, नृत्य असा त्रिकुट साधला जाणार होता. नृत्यासाठी रोहिणी भाटे यांना बोलावले जाणार होते.

कार्यक्रमाची सुरवात झाली. नृत्यात चक्रधार नावाचा प्रकार असतो. एक छोटीशी बंदिश, असणाऱ्या तालात, तीन वेळा घेतल्यास ती बंदिश समेवर येते. त्या बंदिशीचे बोल नृत्य करणाऱ्याला बोलावे लागतात. तेव्हा तबला आणि संवादिनीवर लेहरा सुरू होतो. तेच बोल नर्तिका अथवा नर्तक आपल्या नृत्यातून पेश करतात. अशाप्रकारे रोहिणीजींनी बंदिशीचे बोल व्यवस्थित बोलल्या. पण जेव्हा नर्तन सुरू झाले तेव्हा पहिल्यावेळेला बोल लयीत होते. दूसऱ्या वेळेस लय कमी जास्त होत हाती. तबला एका बाजूला आणि नर्तन एका बाजूला अशी अवस्था झाली. लेहरा सोळा मात्रांचा होता. तिसऱ्या वेळेस जेव्हा बोल घेतले जातात, ते तेराव्या मात्रेपासून सुरू होतात व नर्तनपण सुरू असते. दुसऱ्यावेळेलाच लय हलल्यामुळे गडबड झाली होती.

ही तिहाई समेवर येणे गरजेचे होते.

आप्पांना काहीतरी गडबड झाल्याचे कळताच, त्यांनी तेराव्या मात्रेवर लेहरा सुरू केला कारण तिथूनच तिहाईच्या शेवटच्या भागाची सुरूवात होती. पं. वसंतराव देशपांडे यांना आप्पांनी केलेली ही गोष्ट कळाली व ते पटकन म्हणाले, 'आता सम नक्की येणार.' आणि अगदी तसेच झाले.

कलाकार आणि वादक यांच्यात जर समन्वय असेल तर कोणतीही गोष्ट, एखादी चूक सुधारू शकते आणि चांगल्या गोष्टींना दाद पण मिळू



शकते. या उदाहरणावरून हे प्रकर्षाने जाणवून येते.

षष्ट्यब्दीपूर्ती सोहळा

पुणे, दि. ३१ (लो.प्र.) नामवंत हार्मोनियम वादक श्री आप्पा जळगांवकर यांचा केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्री विठ्ठलराव गाडगीळ यांच्या हस्ते गेल्या शुक्रवारी रात्री सत्कार करण्यात आला.

प्रसिद्ध गायक पं. जसराज, गंगुबाई हनगल व सतत तीन वर्षे संगीत नाटक अकादमीच्या पुरस्कार विजेत्या किशोरी आमोणकर पुरस्कार समारंभाला उपस्थित होत्या. आप्पा जळगांवकर सत्कार समिती तर्फे हा समारंभ आयोजित करण्यात आला होता. सत्कारास उत्तर देताना आप्पा म्हणाले,'ज्या यातनामय कष्टाचे आयुष्य मी काढले त्यात पूर्वी जर कोणी षष्ट्यब्दीपूर्ती निमित्त माझा सत्कार होणार असे म्हटले असते, तर त्यावर माझा विश्वास बसला नसता. आजचा हा माझ्या जीवनातील भाग्याचा दिवस आहे. हा माझा सत्कार नसून तो भारतीय संगीत कलेचा सत्कार आहे. भारतीय संस्कृतीत गुणांची पूजा ही नेहमीच होत आलेली आहे.' अशा भावपूर्ण शब्दात श्री. जळगांवकर यांनी आपले हृद्‌गत बोलून दाखविले.

हृदयस्पर्शी, मन हेलावून टाकणाऱ्या आणि स्नेहभावनेने ओतप्रोत भरलेल्या या दुर्लभ सत्कार सोहळ्यास पुणेकर रसिकांनी मोठा प्रतिसाद दिला. गरवारे महाविद्यालयाचे हे सभागृह स्त्री-पुरुषांच्या उपस्थितीने खच्चून भरले होते. माणिक वर्मा, सरस्वती राणे, रोहिणी भाटे, गजानन वाटवे यांचाही उपस्थितांमध्ये खास उल्लेख करावा लागेल. प्रसिद्ध समाज नेते श्री. नानासाहेब गोरे हे ही समारंभास आवर्जून उपस्थित होते.

सत्कार समितीचे उपाध्यक्ष श्री. एस. एन. कौशिक यांनी प्रास्ताविक केले. मधुरा जसराज यांनी श्री. आप्पा जळगांवकर यांच्या पत्नी सौ. लीलाताई जळगांवकर यांचा सत्कार केला. यावेळी झालेल्या वक्त्यांच्या भाषणांची रंगत

संगीत मैफिलीत शोभावी, अशा चढत्या श्रेणीने रंगत गेली. आयुष्याची तीन दशके ज्यांनी हार्मोनियमवर आपणास साथ केली त्या आप्पांबद्दल बोलताना गंगुबाई हनगल यांना तर भावना अनावर झाल्या होत्या.

'आप्पा हे आमच्या कौटुंबिक जीवनातील एक अविभाज्य घटक आहेत' असे त्या म्हणात्या. रोहिणी भाटे आणि पंडित जसराज यांच्या भाषणाच्या जुगलबंदीत परमोच्च बिंदू गाठला होता.

आप्पा जळगांवकर यांना अभिष्टचिंतन करणारे जे संदेश आले त्यात प्रधानमंत्री श्री. राजीव गांधी, राज्यपाल डॉ. शंकरदयाळ शर्मा, हिराबाई बडोदेकर, पं. भिमसेन जोशी, तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी, पं. रवीशंकर, पं. मल्लिकार्जुन मन्सुर, निवृत्ती बुवा सरनाईक, पं. कुमार गंधर्व यांचा समावेश आहे.

सत्कार समारंभानंतर किशोरी आमोणकर व पं. जसराज यांचे गायन झाले. श्री. आप्पा जळगांवकर यांचा हार्मोनियम वादनाचा कार्यक्रम झाला. रात्री ९.३० वा. सुरू झालेला हा कार्यक्रम पहाटे साडे तीन वाजेपर्यंत चालू होता. एक अत्यंत भवस्पर्शी आणि वेगळा, अनेक दिवस आठवणीत राहणारा कार्यक्रम असे त्यांचे वर्णन करावे लागेल.



# बोल

## स्वरांची देण

आप्पांना सुरांची प्रचंड जाण होती. स्वरांचा आत्मा आप्पांच्या बोटांनी ओळखला होता. आप्पांना स्वरांची देण होती. मागच्या वीस वर्षात मी बऱ्याच वेळा महाराष्ट्रात येऊन गेलो. मुंबईला जेव्हा मी पहिल्यांदा आलो तेव्हा माझ्यासोबत आप्पा साथीला आहेत असे मला कळाले. तेव्हा मला खूप आनंद झाला. लेहरा खूप चांगला असला की आम्हा नर्तकांना नवीनच उत्साह येई.

आप्पा लय खूप पक्की पकडत. त्यांची लय कधीही हलत नसत. मला अजूनही आठवतं की आप्पा किती शांतपणे, प्रेमाने ती हार्मोनियम समोर घेऊन बसत. दिल्ली येथे झालेल्या आप्पांच्या एका कार्यक्रमाला मी गेलो होतो. नेहरू सेंटर येथे झालेल्या या मैफिलीत मी फक्त आप्पांची हार्मोनियम ऐकायला गेलो होतो.

गुरूंचे नाव मोठे करणे हे शिष्यांचे कर्तव्य असते. आप्पांचे सर्व शिष्य जेव्हा हार्मोनियमवर हात ठेवतील तेव्हा आप्पांचे दर्शन झाले पाहिजे. याहून मोठी गोष्ट कोणती असू शकते, नाही का ?

'स्वर की आत्मा को आप्पाजीने अच्छी तरह से समझा था,' असं मला प्रामाणिकपणे वाटते.



पद्मविभूषण पं. बिरजु महाराज

(कथक सम्राट)

## हवाहवासा वाटणारा सहवास


ज्येष्ठ गायक, अजय पोहनकर आप्पांविषयी सांगतात की, ‘मला असं वाटतच नाही की आज आप्पा आपल्यामध्ये नाहीत, असं वाटतं की ते इथेच आहेत कुठेतरी, आता बघा मी पुण्याला निघालोय पण आता सुद्धा आप्पा मला- अरे तुझा सूर कुठला रे, असं विचरित आहेत असं मला सारखं वाटतं. या सगळ्या आठवणींमुळे आप्पा गेलेत असं वाटतच नाही.’

आप्पांचा सगळ्या कलाकारांसमवेत मित्रत्वाचे नाते होते. त्यांच्या सहवास आम्हा सर्वांनाच खुप हवाहवासा वाटायचा. श्रीकांत देशपांडे, सतीश कौशिक, गोविंद बेडेकर, सत्यशिल देशपांडे, नाथराव नेरळकर अशा सर्वांसोबतच आप्पा खूप छान होते. त्यांच्यात आणि आमच्या वयात तसं खूप अंतर होते  पण आप्पा आमच्यासोबत एक मित्र म्हणनूच पाहिले. आप्पांचा गायकीचा अभ्यास एवढा जबरदस्त होता की ते कोणत्याही कलाकारासमवेत बसत व त्या कलाकाराला असे वाटे की ही हार्मोनियम नवीन नसून कित्येक वर्षांपूर्वी पासून वाजत आलेली आहे. आप्पा अतिशय श्रेष्ठ कलाकार होते पूर्ण दुनिया ही गोष्ट जाणते. आप्पांनी गुलाम अली यांच्यापासून  ते पं. भिमसेन जोशी, वसंतराव देशपांडे, जसराजजी या सर्वांसोबत साथ संगत केली आहे. श्रीकांत देशपांडे व माझ्यासोबत संवादिनी साथ केली आहे, आजचे तरूण गायक संजीव अभ्यंकर यांना देखील आप्पांनी साथ केली. एक साथीदार म्हणून आप्पांनी कसलाच त्रास किंवा कष्ट कलाकारांना दिले नाहीत. आप्पा प्रत्येक कलाकाराला व्यवस्थितपणे सांभाळून घेत. आप्पा हार्मोनियम अशी वाजवत की समोरच्या व्यक्तिला वाटलंच पाहिजे ‘आप्पांनी जन्म हार्मोनियमसाठी घेतला आहे.’ संगीतात चालणाऱ्या राजनीतीपासून आप्पा खूप दूर होते. आप्पांना साथीला बोलावले



आणि पैशाची अडचण असल्यास आप्पा म्हणत, ‘पैशाचं सोडा आधी मैफिल तर होऊ द्या.’

आप्पांची माणुसकी, संगीताप्रति त्यांची प्रामाणिक भावना आपल्या सगळ्यांनाच दिसून येते. आप्पा जितके श्रेष्ठ कलाकार तितकेच एक व्यक्ति म्हणून सुद्धा महान होते. त्यांना कसल्याच गोष्टीचा अभिमान नव्हता. माझ्यासोबत आप्पांनी सुमारे चाळीस वर्षे साथसंगत केली.



पं. अजय पोहनकर

(गायक)

## कलाकारांचा साथीदार

आप्पा हे संपूर्ण पुणेकर रसिकांचेच नव्हे, तर देशातील श्रोंत्याचे लाडके हार्मोनियम वादक होते. स्टेजवर येताच ते आपले वाटत. हा त्यांचा करिश्मा होता. तो त्यांनी कला, मेहनत व स्वभावातून मिळवला होता. सगळ्यांची मने खेचून घेणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

स्वर आणि लयीबाबत ते अत्यंत संवेदनशील होते. त्यामुळे त्यांच्या व्यक्तिमत्त्वात एक विशेषता आली होती. त्यामुळे ते हाडाचे सुरेल, लयदार कलाकार होते. त्यांच्या नजरेतूनही सुरेल कलाकार सुटत नव्हता. अगदी नव्या कलाकारालाही ते मनमुक्त दाद द्यायचे. त्यामुळे सगळ्यांचाच उत्साह वाढायचा. कलाकार म्हणून जेवढे मोठे होते तेवढेच माणूस म्हणूनही मोठे होते. रात्री-अपरात्रीही मदतीसाठी पुढे यायचे.

आयुष्याच्या सुरूवातीला त्यांनी अत्यंत हालअपेष्टा सहन केल्या. खूप कष्ट घेतले. त्यातून स्वतः चे व्यक्तिमत्त्व उभे केले. अत्यंत कष्ट, धडपड कलाकाराच्या आयुष्यात असते. पण त्याला त्यांनी कधी रडगाणे केले नाही. त्यात आनंद मानला. संगीत ही आनंदमय यात्रा आहे, ती त्यांनी पूर्ण केली. कधीच पुरस्कार किंवा इतर काहीही मिळाले नाही. म्हणून तक्रार केली नाही.

ते गायनासाठी साथ करीतच, पण तबलावादकाबरोबरही साथ करायचे, ती अतिशय कठीण बाब असते. एवढेच नव्हे, तर नृत्याबरोबरही साथ द्यायचे. त्यांनी अनेक शिष्य घडविले. सुरूवातीच्या काळात त्यांनी मल खूप साथ दिली. माणसांना खेचणारे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. सगळ्यांना ते मदत करायचे. पैशासाठी कधीच कोणाला अडविले नाही. ते फार मोठे कलाकार व माणूस होते.

पं. सुरेश तळवलकर
(तबलावादक)



## अंतरीक प्रेम करणारी व्यक्ति

आप्पांचे व्यक्तिमत्त्व उत्साही, प्रसन्न, व आनंदी होते. आमची ओळख फ्रान्सला झालेल्या एका मैफिलीत झाली. १९७० साली आम्ही फ्रान्सला एकत्र गेलो होतो. साधारण एक महिना आम्ही सोबत होतो. या ओळखीनंतर आमच्यात छान मैत्री जमली. आप्पांविषयी मी असा अनुभव घेतला की, 'आप्पा, जसा गायक गात अगदी त्याच प्रकारे हार्मोनियम वाजवत.'

भिमसेनजी सोबत साथ करताना आप्पा भिमसेनजी होऊन जात. जसराजजीं सोबत वाजवताना जसराजजी होऊन जात. आप्पांचे हे वैशिष्ट्य होते. आणि अजून एक कौतुकास्पद गोष्ट म्हणजे, आप्पांचे स्वर जे लोकांच्या हृदयाला भीडत, ते स्वर आप्पा आपल्या बोटांमधून, आपल्या हातातून लोकांपर्यंत पोचवत.

सूर आणि ताल याचे सखोल ज्ञान आप्पांना होते. आप्पा माझ्यापेक्षा वयाने मोठे, तरीपण माझ्यासोबत एक मित्र म्हणूनच त्यांनी नातं ठेवलं. अगदी मित्रासारखेच वागले . आप्पांची हार्मोनियम एक जादुई पेटी होती असे म्हणले तरी आश्चर्य वाटायला नको.

आप्पा सर्वांसोबतच एक सुंदर नातं जपत. त्यांची सगळ्यांसोबतच मस्त मैत्री होती. उदाहरणच घ्यायचे झाले तर, एकदा आप्पा आजारी होते. त्यांना के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये ठेवण्यात आले होते. तेव्हाच गंगुबाई हनगल यांची पुण्यात मैफिल होती. गंगुबाई हनगल यांनी मला विचारले, 'हार्मोनियम वर कोण आहे,' तेव्हा संयोजक म्हणाले, 'आप्पा तर आता नाहीयेत, ते तर हॉस्पीटल मध्ये आहेत.' ही गोष्ट ऐकताच गंगुबाई हनगलजी के.ई.एम. हॉस्पीटलमध्ये आल्या.

आप्पांना भेटून गंगुबाई हनगल यांनी आप्पांचा हात हातात

घेऊन तिथेच उभ्या राहिल्या. दोघांच्याही डोळ्यांतून पाणी वाहत होते आणि या दोन श्रेष्ठ कलाकारांना पाहून आम्ही सगळे गपचूप उभे होतो.

उस्ताद उस्मान खाँ

(सतारवादक)



सहवादन

आप्पांनी आणि मी सहवादन केले आहे. इ.स. १९८१ मध्ये आप्पांनी आणि मी ओशो आश्रमात हार्मोनियम व बासरीचा मिलाप साधला होता. तेव्हा राग मारूबिहाग सादर केला होता. जुगलबंदीपेक्षा सहवादन हा शब्द मला योग्य वाटतो कारण त्यात एकमेकांना सांभाळून घेत साथ केली जाते. या कार्यक्रमाला बरीच गर्दी झाली होती.

गरवारे हॉलमध्ये आप्पांचा हार्मोनियम सोलो होता. तिथेच मी आप्पांची हार्मोनियम वाजवण्याची शैली ओळखली होती. आप्पा जे काही वाजवत, ते त्यांच्या डोळ्यांनी व हाताच्या इशाऱ्याने श्रोत्यांपर्यंत पोचवत. आप्पांनी फक्त हार्मोनियमवर श्रद्धा ठेवून, त्याची साधना करून फियाट पद्मीनी ही कार खरेदी केली.

इ.स. १९९६ मध्ये दुसऱ्यांदा सहवादन करण्याचा मौका मिळाला. कार्यक्रम भरतनाट्य मंदिरात होता व संवादिनी-बासरी असे सहवादन चालले होते. अचानक लाईट गेली. आणि आश्चर्य असे की आमचा कार्यक्रम सुरूच होता, लोकं शांतपणे ऐकत बसले होते. हा क्षण माझ्या आयुष्यातला खूप समृद्ध करणारा क्षण मानतो मी.

उस्ताद बिस्मील्ला खाँसाहेब यांनी सुद्धा आप्पांसोबत वाजवण्याची इच्छा दर्शवली होती. आप्पांचा त्याग सुद्धा बऱ्याच ठिकाणी दिसून येतो. माईंच्या नावाने त्यांनी पुरस्काराची सुरूवात केली.

आप्पांसारखे श्रेष्ठ कलाकारासमवेत मला सहवादन करण्याची संधी मिळाली, हे माझे भाग्यच होते.

पं केशव गिंडे

(बासरी वादक)

आप्पा माझ्यापेक्षा वयाने मोठे होते. मी १९५२ मध्ये पुण्यात आल्यावर त्यांच्याकडेच गेलो. त्यांच्या बरोबर पं. रोहिणी भाटे यांच्याकडे माझे तबलावादन सुरू झाले. त्यांनतर देशभरातील विविध ठिकाणी वादन करण्याची संधी मिळात गेली.

आप्पांच्या लग्नातही मी उपस्थित होतो. साहित्य परिषदेच्या हॉलमध्ये त्यांचे लीलाबाई मुधोळकर यांच्याशी लग्न झाले. त्या हिराबाई बडोदेकर व विश्वनाथबुवा जाधव यांच्याकडे गाणे शिकत होत्या. आप्पांच्या लग्नाचे जेवण ब्राह्मण कार्यालयात झाले. रात्री सावरकर सभागृहात गोदावरी अय्यंगार, माणिक वर्मा, पं. भीमसेन जोशी यांचे गायन झाले होते.

लय, स्वर, ताल यावर त्यांची हुकमत होती. वादन करताना अतिशय एकाग्रता असायची. दुसऱ्यातील चांगले गुण घेण्याची गुणग्राहकता त्यांच्यामध्ये असायची, कुठेही काही चांगले ऐकले की, ते लगेच पेटीतून काढत असत. सध्याचे गांधर्व महाविद्यालय जेथे आहे त्याच्यासमोर जोगळेकरवाड्यात एका खोलीत ते राहायचे. सवाई गंधर्व पुण्यतिथीमध्ये पहिल्या वर्षापासून ते वाजवायचे. ख्यालाचे गायकी अंग त्यांच्या वादनात होते. त्यामुळे त्यांच्या वादनात गायन दिसायचे. ते कोणाची नक्कल करायचे नाहीत. त्यांना खरे तर पद्म पुरस्कार मिळायला हवा होता, पण कोण लक्ष देणार, आकाशवाणीमध्ये त्यांनी अनेक वर्षे अत्यंत मोठमोठ्या कलावंताना साथ दिली. मोठेमोठे कलाकार साथीसाठी मुद्दाम त्यांना मागून घ्यायचे. गंगूबाई हनगलबरोबरही त्यांनी बरीच वर्षे वाजविले. सवाईत जे साथीदार आहेत तेच आणा, असे आयोजक सांगत, कार्यक्रम हे टीमवर्क असते, तो अधिकाधिक चांगला व्हायला पाहिजे, यासाठी त्यांचे प्रयत्न असायचे. आप्पांमध्ये प्रचंड एकाग्रता होती. त्यांनी २२ श्रुतींचे हार्मोनियम केली होती.



त्यांच्याकडे अशा ५ हार्मोनियम होत्या. पांढरी एकपासून नेहमीची पेटी असते, पण त्यांच्याकडे पांढरी चारपासूनच्या हार्मोनियम होत्या. त्यामुळे गायकाचा स्वर कितीही उंच गेला तरी, त्यांच्या हार्मोनियममधून सूर निघू शकत होते. प्रत्येक गायकाप्रमाणे त्यांनी हार्मोनियम करून घेतल्या होत्या. त्यामुळे स्वत:ची हार्मोनियम असल्याशिवाय ते कोठेही जायचे नाहीत. हार्मोनियम स्वतंत्र वादनाचे त्यांचे कार्यक्रमही खूप छान होत. गाणे सुरू आहे असेच वाटायचे, अनेक अनवट राग ते वाजवायचे. हार्मोनियममध्ये मिंड वाजविणे अवघड असते. भात्यात किती प्रमाणात हवा घ्यायची, याचे कसब असते.

पं. चंद्रकांत कामत

(तबला वादक)

## गायकानुसार संवादिनी बदलणारा वादक

आप्पा हे असे एकमेव कलाकार होते जे एकाच हार्मोनियमवर सर्व कलाकारांना साथ देत नसत. प्रत्येक कलाकारासाठी वेगळी हार्मोनियम ट्यून करून ठेवली होती. त्या कलाकारांसोबत तीच हार्मोनियम असे ठरलेलेच होते. आप्पा एकाच वेळी तीन तीन हार्मोनियम घेऊन प्रवास करत.

आप्पांनी कधीच कलाकारांमध्ये भेद केला नाही. एखादा कलाकार अत्यंत श्रेष्ठ असो किंवा कोणता बालकलाकार असोत, आप्पा त्याच उत्साहात वाजवत. नवीन कलाकारांना प्रोत्साहन देत. आप्पा फक्त वादकच नव्हते तर त्यांना संगीतशास्त्राचे खूप ज्ञान होते. त्यांच्या संपर्कात मी अनेक वर्ष राहिलो. अनेक गोष्टी त्यांच्याकडून शिकलो. गायकाकडून जर एखादी चूक होत असेल, तर त्यांना सुधारण्याचे मोठेपण आप्पा दाखवत. आप्पा जेव्हा लेहरा वाजवत तेव्हा तबला वादकांना एक नवीन उत्साह यायचा, वाजवण्याची नवीन उमेद वाटायची. आप्पांचे डोळे खूप बोलके होते. त्यांचा चेहरा व डोळे गाण्याचा दर्जा दर्शवत. आप्पांचा चेहरा आनंदित, प्रसन्न असेल तर ती गायकी अतिशय चांगली सुरू आहे आणि चेहरा उतरलेला दिसला की कुठेतरी काहीतरी कमी आहे असे लगेच कळायचे.

जेव्हा आप्पांचा सोलो हार्मोनियमचा कार्यक्रम होत असे तेव्हा आप्पा गायकीच्या अंगाने हार्मोनियम वाजवत. आप्पांचे असे म्हणणे होते की, बऱ्याचशा सभागृहामध्ये, एअर कंडीशन असल्यामुळे तानपुरे उतरत, त्यामुळे गायकांना तानपुऱ्याची साथ न घेता हार्मोनियमची साथ घ्यावी लागे.

माझे गुरू पं. भिमसेन जोशी यांच्यासोबत अनेक मैफिलीत आप्पांनी साथ केली. इ.स. १९७७ साली हे दोन श्रेष्ठ कलाकार काही कारणामुळे वेगळे झाले. सात आठ वर्षांनतंर पं. कुमार गंधर्व यांचे गायन झाले. त्यांना




हार्मोनियमवर आप्पांनी अप्रतिम साथ केली. आपले गायन चांगले व्हावे व त्यासाठी हार्मोनियमची साथ चांगली व्हावी, अशी भिमसेनजींची इच्छा सहाजिकच होती. तेव्हा भिमसेनजी मला म्हणाले, 'जा आणि आप्पांना सांग की उद्या माझ्यासोबत साथ करायची आहे.'

आप्पांचे वैशिष्ट्य भिमसेनजींना चांगलेच माहिती होते, म्हणनच तर भिमसेनजींनी दुसऱ्या कोणत्याच हार्मोनियम वादकाचा विचार न करता, आप्पांनाच साथीला बोलावले. १९७७ नंतर कित्येक वर्षांनी आप्पांनी भिमसेन जोशी व पं. कुमार गंधर्व यांना साथ केली.

या सवाई गंधर्व संगीत महोत्सवात भिमसेनजींना साथ करणं ठरलेलं नव्हतं, पहिल्या दिवशी कुमार गंधर्व यांचे गायन होते व त्यांना आप्पांनी साथ केली. दुसऱ्या दिवशी भिमसेनजी गाणार होते. मला बोलावून आप्पांना निरोप पाठवला. त्या झालेल्या मैफिलीत आप्पांनी सुंदर साथसंगत केली.

आप्पा जळगांवकर हे असे कलाकार होते जे आयुष्यात प्रत्येक क्षणी प्रत्येक कलाकाराची साथ निभावत, अगदी कोणत्याही परिस्थितीत.



श्रीकांत देशपांडे

(गायक)

संवादिनीला गायला लावणारा वादक

सुमारे १५ वर्षापूर्वीची गोष्ट असेल, सवाई गंधर्व संगीत समारंभात पं. जसराजजींचे गायन, हार्मोनियम साथ पं. आप्पा जळगांवकर आणि तबल्यावर झाकिर हुसेन. या मैफलीच्या नुसत्या आठवणीनेच इतक्या वर्षानंतर आजही माझ्या अंगावर रोमांच उभे राहतात. पं. जसराजजींचा त्या वेळेस गायलेला राग जोग आणि आप्पा व झाकिरभाईंची साथ ही माझ्या आयुष्यातली सर्वाधिक संस्मरणीय मैफिल ठरली. त्या दिवशी पं. जसराजजींचा व आप्पांच्या हार्मोनियमचा आवाज इतका एकरूप आणि एकजीव होता, की क्या बात है!

त्या मैफलीचा जेव्हा मी, संवादिनी वादक अभ्यासक या नात्याने विचार करतो तेव्हा हे लक्षात येते, की गायक कलाकार व साथीदार यांचे एकमेकांवरील निखळ प्रेम, उत्तम साथ घडायला कारणीभूत ठरले असेल, जरी आर्थिक देवाणघेवाण होत असली, तरी कुठलाही कलाकार व्यावसायिक तत्त्व ठेवून कधीच कला सादर करीत नसतो. पं. जसराजजी व आप्पांचे एकमेंकांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यामुळेच ती मैफल अत्युच्च उंची गाठू शकली. साधारपणे १९७२ पासून ते दोन वर्षांअखेरपर्यंत आप्पांचे वादन ऐकण्याचा लाभ मला झाला. लहान असताना आप्पांच्या व्यक्तिमत्त्वाची भीती वाटत असे, परंतु मोठा झाल्यावर जसजसा त्यांचा सहवास लाभत गेला, तसतसा आप्पा हा माणूस अजिबात भीतिदायक नसून अतिशय कोमल हृदयाचा आणि प्रेमळ असल्याची जाणीव होत गेली. सुमारे २० वर्षाचा काळ मी आणि आप्पांनी समव्यावसायिक या नात्याने एकत्रित घालवला. एकत्रित म्हणण्याचा उद्देश समव्यावसायिक असूनसुद्धा आमचे दोघांचे एकमेंकांवरील प्रेम व वागण्याबद्दल असलेल्या आदराला कसलीही बाधा आली नाही. पं. सुरेश तळवलकर यांचा स्वतंत्र तबलावादनाचा कार्यक्रम



गांधर्व महाविद्यालयात काही निमित्ताने ठरला होता. सुरेशजींच्या लेहरा साथीसाठी अर्थातच आप्पांना आमंत्रित केले होते. तेव्हा असलेल्या संस्थेच्या आर्थिक कुवतीनुसार मी आप्पांना प्रेमाने म्हटले, आप्पा प्लीज आम्ही जे काही देऊ शकू ते गोड मानून घ्या. दुसऱ्याच क्षणी माझ्या पाठीत जोरदार धपाटा देवून म्हणाले, 'अरे प्रमोद, ही जागा पैसे कमावण्याची आहे का, मी डोळे बंद करतो, तुला काय द्यायचे ते माझ्या खिशात ठेव.'आप्पांच्या स्वभावातील दोन गोष्ट मला अतिशय भावल्या, त्या म्हणजे किती पैसे मिळणार हे त्यांनी कधीही विचारले नाही आणि कुठल्याही कलाकाराला तो लहान आहे म्हणून नाही म्हटले नाही. पं. जसराजजी किंवा गानसरस्वती किशोरीताई आमोणकर यांची साथ मी ऐकली, तशीच साथ संजीव अभ्यंकर बालकलाकार असताना किंवा आरती अंकलीकर यांच्या लहानपणी आप्पांनी केलेली साथ याची साक्ष आहे.

पूर्वी मी महाविद्यालयात असताना माझ्या सरांनी मला एक बिकट प्रश्न विचारला होता आप्पा जळगांवकर यांच्याबद्दल एका वाक्यात सांग. विचार करायला दोन मिनिटे घेवून मी म्हणालो, हार्मोनियम हे वाद्य ज्या ज्या ठिकाणी वापरले जाते, त्या सर्व ठिकाणी प्रभुत्व असलेला भारतातील सर्वाधिक लोकप्रिय हार्मोनियमवादक. आप्पा काय वाजवू शकत नव्हते! शास्त्रीय संगीत, तेवढ्याच गंभीरतेने ठुमरी, दादरा, गजल तेवढ्याच क्षमतेने नाट्यसंगीत, तितक्याच लडिवाळपणे लेहरा साथ एवढेच काय, ते लावण्यासुद्धा अतिशय तयारीने वाजवत असत. गायन, वादन व नृत्य या तीनही कलांना मिळून संगीत असे संबोधतात, या अर्थाने आप्पा संगीताचे साथीदार होते. कारण पं. भीमसेनजींना साथ असो अथवा उ. अल्लारखाँना लेहरा साथ असो किंवा पंडिता रोहिणी भाटे यांच्या नृत्याला साथ असो, आप्पा तेथे आपला रंग भरणारच.आणि तो रंगसुद्धा कुठला, तर मुख्य कलावंताचा चालला आहे तोच रंग, एका संगीत अभ्यासकाच्या भुमिकेतून

विचार करताना आप्पा हे शास्त्रापेक्षा कलापक्षाच्या बाजूकडे झुकलेले आढळतात. त्या दृष्टीने सर्वसामान्य श्रोत्याच्या काळजाला हात घालण्याची हातोटी आप्पांच्या हातात होती. साध्या साध्या मात्रांच्या हिशोबांची गुंफण करीत सुंदर पद्धतीने तिहाई घेवून समेवर येणे आणि त्यानंतर रसिकांची टाळ्यांची दाद, हे ठरलेलेच असायचे. वादनातील एकसंधपणा हे आप्पांचे गुण मी त्यांच्याकडून न शिकतासुद्धा घेतले आहेत.

काही संगीत समारंभांच्या निमित्ताने आप्पांनी आणि मी एकत्रित प्रवास निवास केला आहे. आप्पांच्या मैफलीत आप्पा एवढे खुलायचे आणि दिलखुलासपणे ती कधी काबीज करायचे, हे उशिरा कळायचे. भारतातील ज्या ज्या गावात शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम झाले, त्या सर्व गावांत आप्पांची हस्त कला तिथल्या रसिकांनी अनुभवली असेल. सवाई गंधर्व महोत्सवात एके वर्षी ग्रीनरूममध्ये गप्पा चालू असताना विख्यात संतूरवादक पं. शिवकुमार शर्मा म्हणाले, ‘आप्पा, तुम्ही ग्रेट आहात. मला स्टेजवर आल्यानंतर बरेच काही वाजवून झाल्यावर टाळ्या मिळतात आणि इथे तर तुम्हाला एंट्रीलाच टाळ्या मिळतात.’

आप्पांना आयुष्याच्या उत्तरार्धात पं. जसराजजी व किशोरीताई यांनी खूप मदत केली. अर्धांगवायूच्या दुखण्यामुळे शिष्याला भाता मारायला बसवून आप्पांना उजव्या हाताने साथ करण्याची अनुमती देण्यामध्ये या दोन्ही कलावंतांचा मोठेपणा दिसून येतो. गायक व साथीदार यांच्या अशा संबंधाची उदाहरणे निश्चितच आदर्शवत आहेत.

प्रमोद मराठे

(हार्मोनियमवादक )




## एक सुरेल व्यक्तीमत्व

माझा आप्पांचा परिचय १९६७ साली नोव्हेंबर मध्ये सवाई गंधर्व संगीत महोत्सवात स्टेजवर झाला. एक उत्तम हार्मोनियमवादक म्हणून ते सर्वांना परिचित होते. पण एक अष्टपैलू आणि व्यासंगी व्यक्ति म्हणूनही ते लोकप्रिय होते. बालकलाकारांपासून ते मोठमोठ्या ज्येष्ठ कलाकारांबरोबर म्हणजे पं. जसराज, किशोरी ताई, पं. भीमसेन यांच्या बरोबर ते तितक्याच अत्मियतेने रंगून साथ संगत करत असत.

शास्त्रीय राग गायनातील गायकी अंगाने साथ करणे ही आप्पांची खासीयत होती. त्यांची साथसंगत ही मैफल रंगवणारी आणि पोषक असे. त्यात कुठेही आक्रमकता नसे. त्यामुळे ते लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना साथीला हवे हवेसे वाटत. माझ्या बरोबर त्यांनी दोन वेळा आकाशवाणीवर नॅशनल कार्यक्रम वाजवले. आणि इतर वेळा औरंगाबाद, मुंबई, दिल्ली आणि अनेक ठिकाणी साथसंगत केली. मुंबईत एकदा माझे गाणे एन.सी.पी.एत ठरले होते. आप्पा कुठे बाहेरगांवी दौऱ्यावर होते. तेथून आप्पांनी मला फोन केला आणि सांगितले की त्याच दिवशी मुंबईत येत आहे. तेंव्हा संध्याकाळी माझ्याबरोबर पेटीसाथीला असेल. त्या मैफिलीत आप्पांनी माझ्या मारवा रागाच्या गायनाला अप्रतिम साथ केली आणि नंतर सर्व मित्रमंडळीना - ‘पद्माकर अप्रतिम गायला’ असे सांगितले. असे हे आप्पा मोठ्या मनाचे कलाकार होते. बिदागी बद्दल आप्पा कधीही कलाकारांबरोबर वाद घालत नसत. चिंचवडला माझ्या एकसष्टी वेळी आणि अनेक वेळी डॉ. वसंतराव देशपांडे फांऊडेशन मध्ये त्यांनी साथ संगत केली. प्राधिकरणात संगीत अकादमीच्या उद्घाटनाला आप्पांनी उत्तम सोलोवादन केले होते.

कार्यक्रमानंतर नेहमीच जेवण खाण होई. त्यावेळी आप्पा संगीतातील किस्से, कलाकारांच्या आठवणी अनुभव इतके चटकदार पद्धतीने सांगत की मध्यरात्र केव्हा संपून गेली कळत नसे. आप्पा म्हणजे संगीतातले एक चालते बोलते विद्यापीठ होते. त्यांच्या जाण्याने ह्या सर्व गोष्टी आता थांबल्या आहेत.



पं. पद्माकर कुलकर्णी

(गायक)



## गुरू नव्हे सद्गुरू

तसं पाहिलं तर हार्मोनियम व गायनाशी माझी लहानपणापासूनच जवळीक होती. अगदी चौथ्या पाचव्या वर्षापासूनच माझ्या गावातल्या विठ्ठलमंदिरात कायम भजन किर्तन अशा कार्यक्रमात मी सहभागी होत असे. तिथे मी हार्मोनियम वाजवत होतो. लहान वयातच संवादिनी प्रति लगाव वाढत गेला. गावाकडे साक्षरता मोहिम होत असे. त्यात गावातील लोकांना प्राथमिक शिक्षण दिले जायचे, काही साक्षरतेवर आधारित गाणी होती ती मी हार्मोनियमसोबत गायचो. लोकांचा  चांगला प्रतिसाद मिळत होता. लहानपणापासूनच माझ्यावर थोड्याफार प्रामाणात संस्कार होत गेले.

वडिलांची नोकरी पुण्यात असल्या कारणाने आमचं सगळं कुटुंब पुण्यात स्थलांतरित झाले. चिंचवड येथील वाद्यविद्यालयचे श्रीपाद गोडसे यांच्याकडे हार्मोनियम शिक्षण घेण्यास सुरवात केली. मी तेव्हा हार्मोनियमला खूप प्राधान्य दिले. अगदी तेव्हापासूनच मला रियाजाचे महत्त्व समजले.

पिंपरी-चिंचवड शहरात झालेल्या, तिसऱ्या स्वरसागर महोत्सवात गानसरस्वती किशोरी आमोणकर यांचे गायन होते. त्यांना आप्पा जळगांवकर साथ देत होते. किशोरीताईंना आप्पांनी दिलेली साथ पाहून मी स्वत:शीच एक निर्धार केला, ‘हार्मोनियम वादन जर आत्मसात करायचे असेल तर ते फक्त आप्पांकडूनच.’ हा निर्धार मनाशी पक्का ठेवून मी आप्पांचा नंबर मिळवला. मला चार ते पाच महिन्यात नंबर मिळाला. मी आप्पांना लगेचच फोन केला. आप्पांनी मला दुसऱ्या दिवशी संध्याकाळी चार वाजता यायला सांगितले.

आप्पांनी मला बोलावले. त्यामुळे मी खूप खुष होतो. सकाळी दहा वाजताच मी निघालो. खिशात फक्त दहा रूपये. पुण्याला चाललो आहे. असं घरच्यांना सांगितले व साधारणपणे सकाळी दहाला निघालो. चिंचवड

स्टेशन वरून १०.२० लोकल होती. लोकल मध्ये चढलो. ११:१५ पर्यंत मी शिवाजीनगर स्टेशनला उतरलो. आप्पांच्या एका शिष्याने मला पत्ता सांगीतला होता. तरंग हॉटेल शेजारी, अश्वमेघ बिल्डिंग, सदाशिव पेठ. तो पत्ता शोधत, इकडे तिकडे विचारत मी शिवाजीनगर पासून निघालो. १२.३० च्या सुमारास मला तो पत्ता सापडला. आप्पांनी मला चार वाजता बोलावले होते. आप्पांनी दिलेल्या वेळेच्या चार तास अगोदरच पोहचलो.

माझ्याकडे चार तास शिल्लक होते. वेळेवर आप्पांकडे पोचायचे होते, म्हणून मी लवकर निघालो होतो. तो वेळ मी त्याच परिसरात घालवला व बरोबर चार वाजता मी आप्पांच्या घराची बेल वाजवली. घरात गेलो, आप्पांनी घड्याळाकडे बघून म्हणाले, 'तूच का तो चिंचवड वरून येणारा?' 'हो मीच,' असे म्हणत मी आप्पांच्या पाया पडलो. मी तिथेच बसून होतो. आप्पा नेहमीप्रमाणे आपल्या काही शिष्यांसोबत बसलेले. आप्पा मला म्हणाले, 'तू तर अगदी वेळेवर आलास.' आप्पांची प्रॅक्टीस सुरू होती. मी त्यांचे वादन बराच वेळ ऐकत बसलो. आप्पा मला म्हणाले, 'तुला जे येतेय ते वाजवून दाखव.' मी त्यावेळेस राग भैरव वाजवून दाखवला. बऱ्याच वेळानंतर आप्पा बोलले, 'तू येत जा.'

आप्पांचे ते बोलणे ऐकून मला इतका आनंद झाला की तो शब्दात व्यक्त करू शकत नाही. आप्पांचा स्वभाव खुप छान होता. कोणालाच कधीच ते नाराज करत नसत. मी साधारण सात वर्ष आप्पांकडून हार्मोनियम वादनाची कला आत्मसात करणाऱ्याचा प्रयत्न केला. फी नावाचा प्रकार मला सात वर्षात आप्पांकडे अजिबात बघायला मिळाला नाही. फी बाबत मी जेव्हा आप्पांना विचारले होते, ते म्हणाले, 'बाकीची चिंता तू करू नको, तू येत राहा.' मी शिकत असताना, तीन वर्षांनी, आप्पांच्या गुरूपौर्णिमेत मला हार्मोनियम वादनाची संधी मिळाली. मी तेव्हा यमन राग वाजवला होता. त्यावेळी आप्पा समोरच खुर्चीत बसले होते त्यांनी माझे वादन ऐकले,



वादन झाल्यानंतर मी आप्पांकडे गेलो, आप्पा म्हणाले, 'तू खूप छान वाजवलस, असंच पुढे जात रहा.'

आप्पांचे हे शब्द माझ्यासाठी खूप मोठा आशीर्वाद व प्रोत्साहन देणारे होते. आजही जेव्हा आप्पांना बघतो तेव्हा , 'तू असंच पुढे जात रहा' हे शब्द आठवतात.

आप्पांसोबतचा हा सहवास खूप छान होता. आयुष्यातले ते एक वेगळे पर्व होते. आप्पांच्या ८१ व्या वर्षात पदार्पण निमित्त १५ एप्रिल २००६ रोजी मी पहिल्यांदा कार्यक्रमाचे आयोजन केले. त्यानंतर बऱ्याचदा आप्पांनी चिंचवडला सोलो वादन केले.

३ ऑक्टोबर २००० रोजी, आप्पांच्या स्मरणार्थ, 'संवादिनी कला मंच' या संस्थेची स्थापना केली. त्यावेळी अभिनेते नंदू माधव, पं. माणिकजी मुंडे, हार्मोनियमवादक श्री. प्रमोद मराठे, गायिका कल्पनाताई झोकरकर, पं. पद्माकर कुलकर्णी आदि मान्यवर उपस्थित होते.

या संस्थेअंर्तगत आम्ही उदयोन्मुख कलाकारांना मंच उपलब्ध करून देणे, त्रैमासिक संगीत सभा आणि ग्रामीण भागामध्ये संगीत प्रसार करत आहोत. काही अनाथ आश्रमांमध्ये काही निवडक मुलांना हार्मोनियमचे शिक्षण देण्याचा प्रयत्न करत आहोत.

हा सगळ्या होत असणाऱ्या प्रवास, एक घटना म्हणून आयुष्यभर लक्षात राहिल. पिंपरी-चिंचवड शहरात दरवर्षी स्वरसागर महोत्सव होतो. तिसऱ्या स्वरसागर महोत्सवात मी आप्पांचे वादन ऐकले. ज्या स्वरसागर महोत्सवाच्या मंचावर मी आप्पांना पाहिले त्याच मंचावर मला काही वर्षांनी आमंत्रित कलाकार म्हणून बोलवण्यात आले. हे सगळे फक्त अन् फक्त आप्पांच्या आशीर्वादामुळेच शक्य झाले. खरच सामान्य राहणीमान असणारे असामान्य कलाकार, गुरू नव्हे तर सद्‌गुरू होते. आप्पांनीच माझ्या आयुष्याला एक योग्य वळण दिले.

'सूरसखा' या पुस्तकाचे काम पाच वर्ष चालु होते. बऱ्याच अडचणींना सामना करत हे काम पूर्ण केले आहे. आप्पांच्या आठवणींचा संग्रह करण्यापासुन ते पुस्तकाला पूर्णत्व प्राप्त करून देईपर्यंत च्या अडचणींवर मात करून, हे कार्य पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहेत.या कार्यात काही अनावधानाने झालेल्या चुकांसाठी क्षमस्व.

संतोष घंटे

(आप्पांचे शिष्य)



आसयुक्त वादनातील सहजता

उस्मानाबादात कॉलेजचे शिक्षण घेत असताना आम्ही दोघेही संगीताचे शिक्षण घेत होतो. तेथे अनेक गायनाचे कार्यक्रम ऐकायचा योग आला. त्या दरम्यान पं भिमसेन जोशी यांच्या हार्मोनियम साथीसाठी पं. आप्पा जळगांवकर आले होते. त्यावेळी सुरेश गायनाचे शिक्षण घेत होता. आप्पांची हार्मोनियम ऐकल्या नंतर त्यांनी ठरवले की हार्मोनियम शिकायची ती पण आप्पांकडेच! आप्पांना भेटलो त्यांनी पुण्याला बोलावून घेतले तेथूनच आमचे व आप्पांचे संबंध वडील मुलांसारखे झाले.

आप्पा व्यक्तिमत्वाने व कलेने खूप मोठे होतेच पण ते हृदयांनी खूप कोमल होते. साठ वर्षाहून अधिक काळ तपश्चर्या करुन संवादिनी या वाद्याला प्रतिष्ठा मिळून दिली.

श्रुती प्रधान असलेल्या आपल्या शास्त्रीय संगीतात, हार्मोनियमला त्याकाळी दुय्यम स्थानाची वागणूक देण्यात येत असताना, त्यांनी स्वर विकास करुन या वाद्याला प्रतिष्ठा मिळवून दिली.

हार्मोनियम मध्ये आसयुक्त वादन अत्यंत अवघड असते पण आप्पांनी ते सहज शक्य करुन दाखविले म्हणूनच आप्पा दरबारी किंवा मियाँ मल्हार सारखे राग ते अतिशय सुंदर रित्या वाजवत असतं. त्यांच्या वादनात खूप वैविध्य होते. तसेच त्यांची विनोदबुद्धी उत्तम होती. अनेक पिढ्यांचे कलाकार त्यांच्या साथीने समृद्ध केले, स्वरांप्रमाणे त्यांनी आयुष्यभर व्यक्ती ही जोडल्या. म्हणूनच आम्हा दोघांचे व संतोष घंटे तसेच इतर सर्व शिष्यांचे त्यांच्या सोबतचे दिवस सोन्यापेक्षा ही सुंदर गेले.

फडतरे बंधू

(हनुमंत फडतरे, सुरेश फडतरे)

गणपती बाप्पां सारखे बारीक डाळे, तरी देखील, नजरेतील तिक्ष्णता, पारदर्शी, अंत: करणाचा ठाव घेणारी नजर संवादिनीची साथ करताना मुख्य गायकावर रोखलेली मधूनच श्रोंत्यांच्या अंतरंगात शिरणारी समेवर येताना अनाहूत पणे होणारा अंगूली निर्देश भात्यावरचा हात उचलून गायकाला दिलेली दाद-क्या बात है! श्रोत्यांच्या ओठांवर येणारे उत्स्फूर्त शब्द वाह! वाह! अंगावरील झब्याला देखील पुरुन उरणारी खणखणीत देहयष्टी सावळ्या रंगातही उठून दिसणारी अंगभूत तकाकी चेहेऱ्यावरचं प्रसंग हास्य एक मिष्कलपणा त्यातही चमकणारी बुद्धिमत्तेची झलक बोलके भाव व सुचक देहबोली मोडेन पण वाकणार नाही म्हणणारी वादनाची ताठ बैठक स्वरपट्यांवरती तरलं व मुलायम पणे फिरणारी पाचही बोटं, अलंकारातील मिंडयुक्त गोलाई त्यांच्या गोल चेहेऱ्यासारखी चालण्याची ढब, वादनातून जाणवणारा परिपक्व खानदानी बाज भव्य कपाळावर चकाकणारे धर्मबींदू अस्सल कलाकाराचा धर्म अभिव्यक्त करणारे शास्त्रीय संगिताच्या व्यासपीठावरचं मला झालेलं हे प्रथम दर्शन होतं, पंडित आप्पासाहेब जळगांवकरांचं...

साल १९८५, पावसाळ्याचे दिवस. स्थळ आप्पा बळवंत चौकालगतचा लक्ष्मी क्रिडामंदिराचा हॉल. गायक होते पंडित जसराजजी. पुण्याच्या चोखंदळ व जाणकार रसिकांनी ओसंडून भरलेलं सभागृह, सभागृहात जागा नसल्याने बाहेरच्या परिसरात मिळेल तिथे उभे राहिलेले पावसाची पर्वा नसलेले पुण्याचे रसीक. कार्यक्रम संपल्यानंतर जसराजजीच्या गायकी व्यतिरिक्त एकच चर्चा होती ती म्हणजे पंडित आप्पासाहेब जळगांवकरांच्या पेटीच्या साथीची.

त्यांनतर अनेक संगीत मैफिलीमध्ये आप्पांच्या संवादिनी वादनातील



निर्विवाद प्रभूत्वाचा आस्वाद घेतला. गाणाऱ्यांच्या ताना कोणत्याही घराण्याच्या असोत त्यांची हुबेहुब पुनरावृत्ती वादनातून दाखविण्याचं आप्पांचे कसब याचं एक स्वतंत्र प्रात्यक्षीकच त्यांच्या वादनातून अनुभवास मिळायचं. लयीवरती त्यांचे विलक्षण प्रभुत्व दिसे. एवढेच काय तर बहूतेक सर्वच प्रतिथयश गायक गायीकांना आप्पांची पेटीची साथ हवीहवीशी वाटे त्यातून अनेकांचे गाणे अजून खुलायचे. त्या श्रवण भक्तीतून अनेकांचे प्रबोधन व्हायचे, अनेकांना प्रेरणा मिळायची, मार्गदर्शन मिळायचं. हार्मोनियम वादनातील त्यांचे ज्येष्ठत्व, श्रेष्ठत्व व प्रभूत्व निर्विवाद होते. त्यांच्या श्रृतीयुक्त मिंडप्रधान वादन शैलीमुळे, या पश्रिमात्य वाद्यास, भारतीय पारंपारिक शास्त्रीय संगितमध्ये अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले. त्याचप्रमाणे सहवादनाची सारंगी, दिलरूबा, या पारंपारिक वाद्यांना एक चांगला पर्याय निर्माण झाला. काळानुसार बरीच पारंपारिक वाद्ये कालबाह्य ठरत असताना संवादिनीचा वापर सुगम संगीत, लोकसंगीत, उपशास्त्रीय संगीत या इतर प्रकारातही प्रकर्षाने होऊ लागला. बावीस श्रुती आणि संवादिनी या वादग्रस्त तथाकथीत विषयावरही त्यांचे परखड विचार असत. तसेच या वैचारिक चिंतनाबरोबरच त्यांचे वास्तविक योगदान ही अनन्य साधारण ठरते.

माझ्यासारख्या सामान्य कलाकाराला, त्यांचे नुसते दर्शनही सुखदं वाटत असे. संगीत क्षेत्रातील मान्यवरांमध्ये मान्यता प्राप्त असलेले ज्येष्ठ कलावंत असूनही सामान्य संगीत रसीकांना व कलाकारांना आपलेसे वाटणारे आप्पा असामान्य कलावंत होते. त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन.

त्यांचे अनेक शिष्य आज संवादिनी वादनात अग्रेसर आहेत. स्वतंत्र वादन तसेच शास्त्रीय संगीत मैफिलींमध्ये साथीचे वादन करणारा त्यांचा एक शिष्योत्रम माझ्याही संपर्कात आला. कोणत्याही प्रकारची फी न घेता त्यांनी या शिष्याला मोफत मार्गदर्शन केले. एवढेच नव्हे तर पुत्रवत प्रेम दिले. त्याचे नाव संतोष घंटे. पिंपरी चिंचवड परिसरातून आप्पांच्या भेटी

साठी, खिशात पैसे नसताना पुण्यापर्यंत जाणारा संतोष आणि पहिल्याच भेटीत, पाठीवर थाप मारून त्याला जवळ घेणारे आप्पाजी. गुरू- शिष्य परंपरा निखळ प्रेम व त्यागावर आधारलेली असावी, असेच दर्शविते. पंडित आप्पासाहेब जळगांवकर यांच्याबद्दल विचार व्यक्त करण्याचं भाग्य मला लाभल्याचा सार्थ अभिमान वाटतो.

संजय दातार
( गायक)



## नादब्रह्माचा पुजारी

*संवादिनी वादनी स्पंदले, कोमल भावतरंग*
*अभंग लय स्वरसाथ अनुपम, जगावेगळा ढंग*
*विकलांगी जरी एका हाती, रंगविले श्रृतिरंग*
*परि नाही सोडला, आप्पाजींनी, संवादिनीचा संग*

*संतोष घडविला, दिधले अभय, शिष्यांसाठी घर देवालय*
*तालसूर छंदी ते निर्भय, रागरंगी भिनली अंगी लय*
*स्वरसाथींमध्ये असे रंगले, जणू कमलामधले भ्रृंग*
*परि नाही सोडला, आप्पाजींनी, संवादिनीचा संग*

*नादब्रहम कणश्रृती अनुभूती, साथ तयांची भल्याभल्यांना*
*मार्तंड, विदुषी, योगी, डॉक्टर, स्वययोगिनी, स्वरभास्कर पंडित*
*स्वतंत्र वा साथीचे वादनी, श्रवणी श्रोते दंग*
*एका हाती आप्पाजींनी, रंगविले श्रृतिरंग*

*रागरंग जाणूनी सुरांचा, अरूपी असता वेध तयांचा*
*आलाप ताना गायकांच्या स्वरमींडी दिसे मग, पिंड तयांचा*
*हुबेहूब, बोटांतून निघती, अलंकार स्वर भाव तरंग*
*उत्तुंग वादनी, सदा रंगूनी, रंगविले श्रृतिरंग*

संजय दातार

## सौजन्य

रामभाऊ जोशी (तरुण भारत : अंक २४.०८.१९८६)
संजय संगवई (सकाळ: अंक २४.०८.१९८६)
लोकसत्ता (अंक ०१.०९.१९८६)
अशोक रानडे (सकाळ: दिवाळी अंक २२.१०.२०००)
भारत गजेंद्र कडकर ( सुर गवसलेली साथ)

## मदत

मोहिनी काळे
स्नेहल



## पाठराखण

आप्पाजी सर्वोत्तम संगतकार होते. जितक गाण्यासाठी लागत तेवढेच वाजवायचा. ना जास्त ना कम. तो लयीत परीपूर्ण आहे. आणि जबरदस्त स्वरज्ञानी आहे. इतके असून सुद्धा त्याला गर्वाचा लवलेश नाही. हीच खऱ्या कलावंताची ओळख आहे.

- भारतरत्न पं. भिमसेन जोशी

आप्पा पेटी कुठे वाजवतो, तो तर माझ्यासोबत पेटीवर गातो.

- पं. कुमार गंधर्व

हम बजाते हैं, तो मैफिल जमाने में पंधरा, बीस मिनट लगते हैं। लेकिन आप्पा में कुछ और ही बात है। अगर गायक ने थोडा भी वक्त मैफिल के दौरान दिया तो वे कुछ इस तरह की हरकत कर देते हैं कि सारी मैफिल वाह, वाह करने लगती है।

पं. शिवकुमार शर्मा

वैसे तो उम्र में मै आप्पा से बड़ी हूँ लेकिन उनके संगतकारी के बडप्पन को मैने महसूस किया है।

गंगुबाई हनगल

आप्पाच्या वादना इतके वैविध्य सापडणे मुश्किल आहे.

हार्मोनियमवादक डॉ. अरविंद थत्ते

आप्पाची साथ म्हणजे कलाकाराच्या संगीतातील व्यक्तिमत्त्वाशी एकरूप होत असे.

सतारवादक उ. उस्मान खाँ

गायक-वादकाना समजुत उमजून ते साथ करत असत.

उ. फैयान हुसैन खाँ

एकजिनसी साथ म्हणजे काय, याचा अनुभव त्यांच्या वादनातुन येतो

गायिका आरती अंकलीकर

लयीच्या घट्टपणा आणि आसदार वादन हे आप्पाचे वादनाचे वैशिष्ट

तबलावादक पं. चंद्रकांत कामत

समरसती, चैतन्यदायी, रसली संगत म्हणजे आप्पा.

गायक पं. श्रीकांत देशपांडे

अनेक पिढ्यांचे कलाकार त्यांच्या साथीने समृद्ध झाले.

तबलावादक पं. सुरेश तळवळकर